# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १७ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३५० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## शिवनेरी किल्ल्यावर मधमाशांचा पर्यटकांवर हल्लाबोल; ५० ते ६० पर्यटक जखमी

पुणे : पुण्यातील जुन्नरमधील शिवनेरी किल्ल्यावर आज रविवार असल्याने पर्यटक मोठ्या संख्येने दाखल झाले. मात्र, सकाळच्या सुमारास शिवनेरी किल्ल्यावर असणाऱ्या शिवाई मंदिर परिसरात आग्या मोहळाने पर्यटकांवर हल्ला चढवला. या हल्ल्यात ५० ते ६० जण जखमी झाल्याची माहिती आहे. त्यामुळे शिवनेरी किल्ल्यावर दुर्गप्रेमींची धावपळ पहायला मिळत आहे.यावेळी अनेक लहान मुले देखील किल्ल्यावर असल्याची माहिती मिळत आहे. मिळालेल्या माहितीनुसार आज रविवार(दि. १६) किल्ले शिवनेरीवरील शिवाई देवी मंदिर परिसरात आग्या मोहळाच्या माशांनी हल्ला केला असून त्यात ५० ते ६० पर्यटक जखमी झाले आहेत.शिवाई मंदिर हे पूर्णपणे माशांनी भरले असून मंदिरात दुर्गपेमी अडकलले आहेत. तर काही विद्यार्थी गडावर अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. हल्ला झाल्यानंतर एकच धावपळ सुरू झाली आणि किल्ल्यावरून खाली येण्यासाठी पर्यटक सैरावैरा पळत सुटले. या घटनेची माहित मिळताच आरोग्य विभागाच्या म्बुलन्स शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशी दाखल झाल्या आहेत.पोलिसांनी तातडीने पर्यटकांना गडावरून खाली येण्यास सांगितलं. वनविभागाकडून आग्या मोहळ शांत करण्याचे शर्तीचे प्रयत्न सुरू आहेत. आगी मोहोळाचा हा हल्ला असून दगड मारल्यानेच आग्या मोहळ उठळे असल्याचे काही पर्यंटकांकडून सांगण्यात येत आहे. अनेक पर्यटक या हल्ल्यात जखमी झाल्यानंतर त्यांना म्बुलन्समधून रूग्णालयात दाखल करण्यात आलंय आणि त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

# महाराणा प्रताप यांचे वंशज अरविंद सिंह मेवाड यांचे निधन



उदयपूर : मेवाडच्या राजघराण्याचे सदस्य आणि एचआरएच हॉटेल समुहाचे अध्यक्ष अरविंद सिंह मेवाड यांचे प्रदीर्घ आजारपणामुळे उदयपूर येथे निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते.

अरविंद सिंह मेवाड हे मेवाडचे राजे महाराणा प्रताप यांचे वंशज होते. उदयपूर येथील सिटी पॅलेसमधील शंभू निवासात त्यांच्यावर उपचार सुरू होते. अरविंद सिंह मेवाड यांच्या मागे पत्नी विजयराज कुमारी, मुलगा लक्ष्यराज सिंह मेवाड, मुलगी भार्गवी कुमारी मेवाड आणि पद्मजा कुमारी परमार असा परिवार आहे. सोमवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जाणार असल्याची माहिती कुटुंबियांनी दिली. अरविंद सिंह मेवाड हे भगवंत सिंह मेवाड आणि सुशीला कुमारी यांचे धाकटे पुत्र होते. त्यांचे मोठे बंधू महेंद्र सिंह मेवाड यांचे मागच्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात निधन झाले होते. अजमेरच्या मेयो महाविद्यालयात त्यांचे शिक्षण झाले. त्यानंतर त्यांनी ब्रिटनमध्ये जाऊन हॉटेल मॅनेजमेंटची पदवी घेतली. तसेच विविध आंतरराष्ट्रीय हॉटेलमध्ये त्यांनी प्रशिक्षण घेतले होते. एचआरएच ग्रुप ऑफ हॉटेल्सची स्थापना त्यांनी केली होती. तसेच त्यांनी बरीच वर्ष शिकागो येथे राहून काम केले. मेवाड यांना क्रिकेट, पोलो आणि संगीताची आवड होती. त्यांनी राजस्थानच्या रणजी क्रिकेट संघाचे कर्णधारपदही भूषविले होते. तब्बल दोन दशके त्यांनी क्रिकेटपटू म्हणून मैदान गाजवले होते.

संपत्तीचा वाद

भगवंत सिंह मेवाड १९५५ मध्ये महाराणा झाले. यानंतर काही काळातच संपत्तीवरुन त्यांच्या मुलांमध्ये वादाला सुरुवात झाली. भगवंत सिंह मेवाड यांनी वारशात मिळालेली संपत्ती विकण्यास आणि भाडेतत्त्वावर देण्यास सुरुवात केली. हा निर्णय पटला नाही म्हणून भगवंत सिंह मेवाड यांचे ज्येष्ठ पुत्र महेंद्र सिंह मेवाड यांनी न्यायालयात दाद मागितली. महेंद्र सिंह मेवाड यांच्या कृतीमुळे संपत्तीच्या मुद्यावरुन वाद सुरू झाला. महेंद्र सिंह मेवाड आणि त्यांचे धाकटे बंधू अरविंद सिंह मेवाड यांच्यात वाद सुरू झाला. हा वाद सुमारे ७० वर्षे असाच सुरू राहिला. मीडिया रिपोर्टनुसार मेवाड घराण्याची एकूण संपत्ती १० हजार कोटींच्या घरात जाते. या वादाचे पुढे काय होणार हे लवकरच स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## अल्पवयीन मुलाच्या हातात कार देणे पडले महागात!

ठाणे : राज्यात वाहन परवाना मिळविण्यासाठी किमान वय १८ वर्षे असणे गरजेचे आहे. तसेच परवान्या शिवाय वाहन चालविणे कायद्याने गुन्हा आहे. असे असले तरी काही नागरिक या कायद्याचा भंग करतात. परंतु पोलिसांच्या तपासणीदरम्यान परवाना नसलेले चालक आढळल्यावर मात्र त्यांना कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागते. असाच प्रकार ठाण्यात उघडकीस आला आहे.

आनंदनगर परिसरातील रस्त्यावर कार चालवित असलेल्या एका अल्पवयीन मुलावर तसेच वाहन परवाना नसतानाही त्याला कार चालविण्यासाठी दिली म्हणून त्याच्या वडीलांवर ठाणे वाहतूक पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली आहे. त्यांच्याकडून दहा हजार रुपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे. या कारवाईच्या निमित्ताने अल्पवयीन मुलाच्या हातात कारची चावी देणे वडीलांना महागात पडल्याची चर्चा सुरू झाली आहे.

ठाणे आयुक्तालय क्षेत्रात ठाणे, कळवा, मुंब्रा, दिवा, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर आणि भिवंडी शहरांचा भाग येतो. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात होळी आणि धुलिवंदनाच्या दिवशी ठाणे वाहतुक पोलिसांनी ठिकठिकाणी पथके तैनात केली होती. ही पथकाने श्वास विश्लेषक यंत्राद्वारे चालकांची तपासणी करीत होती. याशिवाय पोलिसांच्या पथकाने चौका-चौकात उभे राहून नेहमीप्रमाणे कारवाई करत होती.

## बीएलएच्या हल्ल्यात पाकिस्तानचे ९० जवान ठार



इस्लामाबाद : बलोच लिबरेशन आर्मी अर्थात बीएलए या संघटनेने दावा केला आहे की त्यांच्या हल्ल्यात पाकिस्तानचे ९० जवान ठार झाले. पाकिस्तानच्या लष्कराचा ताफा क्वेट्टा येथून तफ्तानच्या दिशेने जात होता. यावेळी नोशकी जिल्ह्यात पाकिस्तानच्या लष्करी वाहनांना लक्ष्य करुन हल्ला करण्यात आला. हा हल्ला यशस्वी झाला. या हल्ल्यात पाकिस्तानचे ९० जवान ठार झाल्याचा दावा बीएलएने प्रसिद्धीपत्रक काढून केला आहे.

क्वेट्टाहून तफ्तानला जाणाऱ्या लष्करी ताफ्यात सात बस आणि दोन मोठी वाहने होती. यातील एका बसला आयईडी भरलेल्या वाहनाने धडक दिली. पाठोपाठ दुसऱ्या बसवर रॉकेट-प्रोपेल्ड ग्रेनेडद्वारे (आरपीजी) हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात ९० जवानांचा मृत्यू झाला आणि अनेक जवान गंभीर जखमी झाले. जखमी जवानांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

बलोच लिबरेशन आर्मी अर्थात बीएलए या संघटनेने प्रसिद्धपत्रक काढून दावा केला आहे की, नोशकी येथील आरसीडी महामार्गावरील रख्शान मिलजवळ व्हीबीआयईडी हल्ल्यात ९० जवान ठार झाले. हा हल्ला बीएलएच्या माजिद ब्रिगेड या आर्मी युनिटने केला आहे. लष्करी ताफ्यातील बसपैकी एक बस पूर्ण नष्ट झाली आहे. इतर वाहनांचेही नुकसान झाले आहे.

## नॉर्थ मॅसेडोनियाच्या नाईट क्लबमधील आगीत ५० जणांचा मृत्यू, अनेक जखमी

स्कोप्जे : उत्तर मॅसेडोनिया देशातील कोकानी शहरातील पल्स नाईटक्लबमध्ये रविवारी(दि. १६) पहाटे भीषण आग लागली. या दुर्घटनेत किमान ५० जणांचा मृत्यू झाला आहे.तर अनेक जण जखमी झालेत.

उत्तर मॅसेडोनियाच्या गृह मंत्रालयाचा हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, उत्तर मॅसेडोनियाच्या राजधानी स्कोप्जेपासून सुमारे १०० किमी पूर्वेला असलेल्या कोकानी येथील पल्स नाईटक्लबमध्ये रविवारी(दि. १६) पहाटे प्रसिद्ध हिप-हॉप जोडी एडीएनच्या लाईव्ह परफॉर्मन्स सुरु होता. यावेळी अचानक आग लागली. कार्यक्रमाला सुमारे १,५०० लोक उपस्थित होते.या भीषण दुर्घटनेत ५० जणांचा मृत्यू झाला असून, अनेक जण जखमी झाले आहेत.

या घटनेशी संबंधित अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. यामध्ये नाईट क्लबमध्ये मोठी आग लागल्याचं आणि आकाशात दाट धुराचे लोट दिसत आहेत. या घटनेतील जखमींना शहराच्या दक्षिणेस सुमारे ३० किमी अंतरावर असलेल्या कोकानी आणि स्टिप येथील स्थानिक रुग्णालयात दाखल केले आहे. नाईटक्लबमध्ये सुरु असलेल्या कार्यक्रमादरम्यान आतिषबाजीमुळे आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

## हाफिझ सईदचा विश्वासू सहकारी अबू कताल अज्ञातांच्या हल्ल्यात ठार



इस्लामाबाद : लष्कर - ए - तोयबा या अतिरेकी संघटनेचा सदस्य आणि हाफिझ सईदचा विश्वासू अबू कताल (४३) उर्फ झिया-उर-रेहमान याची शनिवारी रात्री पाकिस्तानमध्ये अज्ञातांनी हत्या केली. अबू कताल संध्याकाळी सातच्या सुमारास झेलम परिसरात सुरक्षा रक्षकासोबत शतपावली करत होता. त्यावेळी अज्ञातांनी हल्ला केला. हल्लेखोरांनी १५ - २० गोळ्या झाडल्या. या हल्ल्यात अबू कताल आणि त्याचा एक सुरक्षा रक्षक हे दोघे घटनास्थळीच ठार झाले. आणखी एक सुरक्षा रक्षक जखमी झाला आहे. जखमी सुरक्षा रक्षकावर उपचार सुरू आहेत.

अबू कतालला हाफिझने अबू कतालला पाकिस्तानकडून संरक्षण देण्यात आले होते. पाकिस्तानच्या लष्कराचे निवडक जवान आणि लष्कर - ए - तोयबा या अतिरेकी संघटनेचे सदस्य अबू कतालचे संरक्षण करत होते होते. एवढे संरक्षण असूनही अबू कतालची हत्या झाली. झेलम परिसरातील दिना पंजाब विद्यापीठाजवळील झीनत हॉटेलजवळ अबू कतालच्या दिशेने गोळीबार करण्यात आला.

हाफिझने अबू कतालला स्वतःच्या संघटनेत चीफ ऑपरेशनल कमांडर या पदावर नियुक्त केले होते. तर एनआयएने २०२३ च्या राजौरीतील स्फोटात अबू कतालचाच हात असल्याचे त्याच्या विरोधात आरोपपत्र दाखल केले होते.

राजौरीतील धांगरी गावात १ जानेवारी २०२३ रोजी अतिरेकी हल्ला झाला होता. या हल्ल्यात दोन मुलांसह एकूण सात जणांचा मृत्यू झाला होता. यानंतर २० एप्रिल २०२३ रोजी भट्टा / दुरिया येथे पाच भारतीय जवानांना अतिरेक्यांनी ठार केले होते.

अबू कताल हा फक्त लष्कर - ए - तोयबासाठीच नाही तर इतर अतिरेकी संघटनांसाठीही मार्गदर्शक म्हणून पाकिस्तानमध्ये कार्यरत होता.

## वेरूळ लेणी येथे पर्यटकांवर मधमाशांचा हल्ला



खुलताबाद : वेरूळ येथील लेणी क्रमांक १६ मध्ये आज दिनांक १५ मार्च शनिवार रोजी सायंकाळी चार वाजेच्या सुमारास लेणी बघण्यासाठी आलेल्या पर्यटकांवर मधमाशांनी एकाएकी हल्ला करून पर्यटकांना घायाळ करून सोडले यावेळी लेणी बघण्यासाठी आलेले पर्यटकांमध्ये एकच धावपळ उडाली असून पर्यटककांमध्ये भीतीचे वातावरण होते. दरम्यान लेणी कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र साहूजी यांनी काही पर्यटकांना वेरूळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्र त्याचप्रमाणे मंगल क्लिनिक येथे आणून प्रथमोपचार केले.

यावेळी दिल्लीहून आलेले पर्यटक रमेश सिंग यांनी बोलताना सांगितले की आम्ही तिघेजण वेरूळ लेणी बघण्यासाठी आलो होतो मात्र येथे आल्यावर एकाएकीच मधमाशांनी हल्ला केला व माझ्या सह आलेले माझे मुंबईचे मित्र प्रतीक सिंग आणि आदित्य हे यांनाही मधमाशांनी जखमी केले आहे.

### पुरातत्व विभाग निद्रावस्थेत

**ही नेहमीचीच घटना दरवर्षी उन्हाळ्यात मधमाशांद्वारे पर्यटकांवर होणारे हल्ले येथे आलेल्या पर्यटकांसाठी आणि नित्याचीच झाली असून भारतीय पुरातत्त्व विभाग याप्रकरणी काहीही कार्यवाही करत असल्याचे दिसत नाही. परिणामी लहान मुले, अबाल वृद्ध तसेच खास महिला वर्गांमध्ये एकाएकी होणाऱ्या हल्ल्यामुळे आलेल्या पर्यटकांना पाय घसरून पडणे, पाय मोचकणे इत्यादी स्वरूपाच्या गंभीर जखमाही होत आहेत. तरी भारतीय पुरातत्त्व विभागाने खबरदारी म्हणून लेणी परिसरामध्ये मधमाशांचे मोहोळ बसू न देणे हाच एक मात्र उपाय आहे. तरी त्यांनी यापुढे खबरदारी घ्यावी.**

**- सतीश देवेंद्र लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते**

## हिंदू नववर्ष स्वागतासाठी मंदिरांनी पुढाकार घ्यावा, कुंभातील गंगाजलाचा तीन अपरिचित मंदिरात जलाभिषेक करावा, रामोत्सव साजरा करावा - राजीव जहागिरदार



छत्रपती संभाजीनगर - हिंदू नवीन वर्ष गुढीपाडव्यापासून म्हणजेच ३० मार्चपासून २० एप्रिल पर्यंत तीन अभियानांचे आयोजन विश्व हिंदू परिषदेने केले आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी दिनांक ३० मार्चला प्रत्येक मंदिराने पुढाकार घेऊन हिंदू नववर्षाचे स्वागत करावे. गुढीपाडवा ते हनुमान जयंती या काळात समाजात विविध पद्धतीने रामोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करावा तसेच गुढीपाडवा ते २० एप्रिल या काळामध्ये तीन अपरिचित मंदिरांचे दर्शन घेऊन मूर्तीवर तेथे कुंभातील गंगाजलाने जलाभिषेक करावा. या तिन्ही कार्यक्रमात हिंदू समाजाने, तसेच वेगवेगळ्या धार्मिक संस्था, संघटना, मंदिरे, संत, धर्माचार्य, पुरोहित, पुजारी, विश्वस्त, भाविक यांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेने केले आहे.

हिंदू नववर्ष स्वागतासाठी मंदिरांनी पुढाकार घ्यावा सध्या आमचे हिंदू नववर्ष ५१२६ सुरू आहे. येत्या चैत्रशुद्ध प्रतिपदे पासून नवीन वर्ष सुरू होईल ते राहील ५१२७ आमची प्राचीन शास्त्रीय हिंदू कालगणना पुन्हा प्रस्थापित व्हावी. याकरिता आमचे हिंदूंचे, नवीन वर्ष एक जानेवारी नाही तर चैत्र शुद्ध प्रतिपदा पासून सुरू होते. या नववर्ष स्वागताचे धार्मिक क्षेत्रातील नेतृत्व मंदिरांनी करावे ही समाजाची स्वाभाविक अपेक्षा आहे. त्या दृष्टीने मंदिरांनी आपल्या वस्तीत, यासाठी पुढाकार घेऊन त्याची योजना करावी.

मंदिरांसाठी किमान कार्यक्रम

१ मंदिरांनी आपल्या शक्तीनुसार हिंदू घरांवर लावण्यासाठी भक्तांना किमान शंभर, पाचशे, हजार भगवे ध्वज वाटप करणे. २ प्रत्येक मंदिरावर किमान दोन मीटर भगवा ध्वज लावावा तत्पूर्वी या ध्वजाचे पूजन आसपासच्या विविध समाजातील ११ किंवा २१ तरुण जोडप्यांच्या हस्ते व्हावे. ३ गुढीपाडव्याच्या दिवशी मंदिर परिसरात नवीन वर्ष स्वागत शोभायात्रा काढावी. किंवा जाहीर कार्यक्रम करावा. ४ आपल्या मंदिर परिसरातील अतिशय गरीब, मजूर, मागास अशांसाठी मिठाईवाटप, कपडे वाटप, असा काही ना काही त्यांना समर्थ करणारा सेवा कार्यक्रम करावा.

**अपरिचित मंदिर दर्शन अभियान :** हिंदू समाजाला प्रामुख्याने नवीन पिढीला मंदिरांशी घट्ट पुन्हा जोडणे.मंदिरांविषयी जनजागृती, मंदिर विचाराच्या/जीवनाच्या केंद्रस्थानी आणणे आणि या निमित्ताने मंदिरांची मंदिर गणना, पुजारी गणना हे तीन उद्देश या अभियानाच्या मागे आहेत. गुढीपाडवा ३० मार्च ते भानू सप्तमी २० एप्रिल २०२५ हा अभियानाचा २० दिवसांचा काळ आहे . यात सहभागी होणाऱ्या प्रत्येकाने आपल्या परिसरातील तालुक्यातील किंवा जिल्ह्यातील किमान तीन अपरिचित मंदिरांना भेट द्यावी. देवगिरी प्रांतात या काळात एक लाख वेगळ्या अपरिचित मंदिरापर्यंत हिंदू युवा वर्ग पोहोचेल. कुभांहून आणलेल्या पवित्र गंगाजलाचा तेथील मूर्तीवर जलाभिषेक करतील.

**कोणत्या मंदिरांना भेट द्यावी :** ज्या मंदिरात आपण आधी गेलेलो नाही,भेट दिलेली नाही, दर्शन घेतलेले नाही, असे आपल्या गावातील, तालुक्यातील जिल्ह्यातील अपरिचित मंदिर. सेवा वस्तीतील मंदिरे, तसेच संवेदनशील वस्तीत (जिथे हिंदु कमी आहे व गैर हिंदु वाढले आहेत) टिकून असलेली मंदिरे.

**मंदिर दर्शनाच्या वेळी काय करावे :** कुभांहून आणलेल्या पवित्र गंगाजलाचा तेथील मूर्तीवर जलाभिषेक करावा,स्थानिक पुजारी किंवा मंदिराची देखभाल करणाऱ्यांचे अभिनंदन करावे. हे मंदिर ज्या आपल्या पूर्वजांनी आपल्यासाठी उभारलं, टिकवलं, त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करावी. मंदिर माहिती व पुजारी माहिती संकलन करावे. आपल्या दर्शनाची माहिती सोशल मीडियावर फोटोसह आवश्य पोस्ट करावी आणि या उपक्रमात सहभागी होण्याचे सर्वांना आवाहन करावे. स्पर्धा -मंदिर भेटीवरील १) लेख, २) फोटो आणि ३) व्हिडिओ या वर्गवारीत स्पर्धांचे आयोजन केले आहे.

**मंदिरांनी या दरम्यान काय करावे :** मंदिरात येणाऱ्या प्रत्येक भाविकांला टिळा लावावा. प्रसाद द्यावा.त्यांची आस्थेने चौकशी करावी. त्यांना मंदिरांची माहिती द्यावी. दिनांक ३० एप्रिल ते हनुमान जयंती रामोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करावा चैत्र शुक्ल. प्रतिपदा दि. ३० मार्चपासून हनुमान जयंती १२ एप्रिलपर्यंत या कालावधीत सर्वत्र रामोत्सवाचे कार्यक्रम व्हावे या कालावधीत वस्ती वस्तीमध्ये प्रभू रामाची प्रतिमा समोर ठेवून राम जन्मभूमी आंदोलनाचा इतिहास सांगावा हनुमान चालीसा घ्यावी शेवटी प्रभू श्री रामाची आरती व्हावी या कालावधीत संतांची प्रवचने आणि आशीर्वाद असावेत.

यावेळी प्रभू श्री राम यांच्या जीवनकथेचा संदर्भ देत समरसता आणि कौटुंबिक प्रबोधन हा विषय ठेवावा.




## आप्पाराव काळे यांची पोलिस उपनिरीक्षकपदी निवड



खुलताबाद प्रतिनिधी कन्नड तालुक्यातील देवगाव रंगारी पोलिस दलात गुणवत्ता पूर्वक सेवा व विशेष कार्य केल्याबद्दल यी पोलीस ठाण्यातील अंमलदार आप्पाराव तुकाराम काळे यांची पोलीस उपनिरीक्षक (झडख) पदी निवड झाली आहे. मागील अनेक वर्षापासून ते आपली जबाबदारी कर्तव्यनिष्ठ व प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. त्यांच्या प्रशंसनीय सेवेबद्दल त्यांना पदोन्नती देण्यात आली. गुन्हेगारी क्षेत्रातही त्यांची कामगिरी प्रभावी ठरली आहे. देवगाव रंगारी गावातील नागरिकांना योग्य ते मार्गदर्शन करणे, अनेकांच्या मदतीला धावून जाणे, गावात एकोप्याचे संबंध निर्माण करणे आदी गोष्टींमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. आप्पाराव काळे यांचे सहकारी पोलीस, कुटुंबीय तसेच मित्र परिवार यांनी पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देवून देवगाव रंगारी पोलीस स्टेशनमध्ये पेढे वाटून आपला आनंद व्यक्त केला.

## सोयगाव शहरासह तालुक्यात धुलीवंदन मोठ्या उत्साहात साजरा,रंग लावीत युवकांनी दिल्या एकमेकांना शुभेच्छा



सोयगाव,दि.१६ मार्च : सोयगाव शहरासह तालुक्यात धुलीवंदन सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.सकाळपासून शहरात चिमुकल्यांसह,युवक व जेष्ठांनी धुलीवंदनास सुरुवात केली होती. चिमुकल्यांसह युवकांनी व जेष्ठांनी एकमेकांना रंग लावीत धुलीवंदनाच्या शुभेच्छा दिल्या.अलीकडे रासायनिक हानिकारक रंग व पाण्याचा अपव्यय करत होळी व रंगपंचमी साजरी करण्याकडे युवा व किशोरांचा कल वाढत चालला असून सर्व सण पर्यावरण पूरक,निसर्गाचा ऱ्हास न होता साजरे करण्यासाठी अनेक माध्यमे,संस्था,सामाजिक कार्यकर्ते कार्य करीत आहे.या आवाहनास प्रतिसाद देत शुक्रवारी धुलीवंदनाच्या दिवशी सकाळ पासूनच शहरात रंगोत्सव साजरा करण्यास सुरुवात झाली होती.चिमुकल्यांसह,तरुण व जेष्ठांनी सकाळपासून एकमेकांना रंग लावीत धुलीवंदनाच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान तरुणांसह चिमुकल्यानी डीजेच्या तालावर थिरकत एकमेकांना रंगीबेरंगी रंगाने रंगवीत धुलिवंदन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी शहरात रस्त्याने रंगाचा सडा पडल्याने शहर मनमोहक दिसत होते. रासायनिक हानिकारक रंग व पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते अमोल निकम,महेश मानकर,दत्तू रोकडे,राम सोहनी,भगवान कोथलकर,सुनील ठोंबरे,दिलीप शिंदे,अरुण सोहनी,योगेश बोखारे,राजू औंरगे,संतोष पवार,विष्णू मानकर,रुषीदास काकडे, गोपाळ पवार,संदिप सोहनी आदींनी पुढाकार घेतला होता. तसेच सोयगाव शहरासह तालुक्यातील काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली चौक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## डॉ.निलेश गावडे यांच्या वित्तीय बाजार या ग्रंथाचे प्रकाशन



सोयगाव,दि.१६ मार्च : येथील अजिंठा शिक्षण संस्था संचलित,संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील प्राध्यापक डॉ. निलेश गावडे यांच्या वित्तीय बाजार या ग्रंथाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.यावेळी मराठी विभागप्रमुख डॉ.दिलीप बिरुटे,स्टाफ सेक्रेटरी प्रा. श्रीकृष्ण परिहार,पदव्युत्तर समन्वयक डॉ. सी.यु.भोरे व डॉ. रामेश्वर मगर,कार्यालयीन अधिक्षक पंकज साबळे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थी व तरुण पिढीला वित्तीय बाजारा बद्दल सखोल असे मार्गदर्शन मिळावे यासाठी हा ग्रंथ उपयोगी पडेल असे मत लेखक निलेश गावडे यांनी व्यक्त केले. डॉ.गावडे यांनी वित्तीय बाजार ग्रंथ लिहल्या बद्दल अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे व सचिव प्रकाश काळे यांनी त्यांचे अभिनंदन केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समिती, अध्यक्षपदी राजन जगताप सचिवपदी प्रतीक लोखंडे

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी राजन जगताप, तर सचिवपदी प्रतीक लोखंडे यांची निवड करण्यात आली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त डॉ. बी. आर आंबेडकर प्रतिष्ठानच्या वतीने यंदा डॉ. आंबेडकर जयंती उत्सव उत्साहात साजरा केला जाणार असून, आतापासूनच पूर्वतयारी सुरू झाली आहे.

प्रतिष्ठानची नुकतीच कार्यक्रमाच्या पूर्वतयारीची बैठक कॅनॉट प्लेसमध्ये पार पडली. यामध्ये कार्यकारिणी घोषित करून अध्यक्षपदी राजन जगताप, तर सचिवपदी प्रतीक लोखंडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि. अर्ज क २१३/२०२५

अर्जदार : १) सोमनाथ साहेबराव जेउघाले, वय. ३३ वर्षे, धंदा. मजुरी, रा. मांजरी ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) नवनाथ साहेबराव जेउघाले, वय. २७ वर्षे, धंदा. शेती, रा. मांजरी ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) लताबाई साहेबराव जेउघाले, वय. ५२ वर्षे, धंदा. घरकाम, रा. मांजरी ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) भामबाई पुंजाराम जेउघाले, वय. ७८ वर्षे, धंदा. शेती, रा. मांजरी ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, पुंजाराम धोंडीबा जेउघाले हे मांजरी ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि. ३०/१२/२००६ रोजी मांजरी ता. गंगापूर येथे मयत झाले असून त्यांच्यानंतर त्यांचा एकमेव मुलगा नामे साहेबराव पुंजाराम जेउघाले हा दि. २०/०१/२०२१ रोजी मरण पावला आहे. मयत पुंजाराम धोंडीबा जेउघाले यांची अर्जदार क. ४ ही पत्नी असून अर्जदार क. १ व २ हे मयत साहेबराव पुंजाराम जेउघाले यांचे मुले असून अर्जदार क. ३ ही त्यांची पत्नी आहे. मयतांना अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात अर्जदार हे मयत पुंजाराम धोंडीबा जेउघाले व साहेबराव पुंजाराम जेउघाले यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्कयानिशी दिले आहे. दि. १४/३/२४

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

## राज्यस्तरीय अखंड हरिनाम सप्ताहाची हभप एकनाथ महाराज जाधव यांच्या कीर्तनाने सांगता



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १६ : पैठण तालुक्यातील बिडकीन येथे राज्यस्तरीय अखंड हरिनाम सप्ताह संत तुकाराम महाराज यांच्या वैकुंठ गमनास यंदा ३७५ वर्षे पुर्ण झाल्याचे औचित्य साधून बिडकीन शहरात दि ९ मार्च ते १६ मार्च हरिनाम सप्ताह आयोजित ह भ प एकनाथ महाराज जाधव यांनी व बिडकीन ग्रामस्थांच्या सहकार्याने केले होते स भु विद्यालय मैदानात करण्यात आले होते, गाथा पारायण तसेच प्रसिद्ध रामायणाचार्य रामरावजी ढोक महाराज यांचे संगीत राम कथा वाचन करण्यात आले,रोज पहाटे पासून भक्ती मे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, व रोज रात्री आठ ते दहा या दरम्यान कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते,आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह , साजरा केल्यामुळेच गाथा पारायण , राम कथा व हरीनाम सप्ताहाची आज १६ मार्च रोजी संत तुकाराम महाराज बीजेच्या दिवसी सांगता झाली ,हरीनाम सप्ताह दरम्यान आज सकाळी बिडकीन शहरातील विविध भागातुन भव्य शोभायात्रा काढण्यात आली त्यानंतर ह.भ.प. एकनाथ महाराज जाधव यांचे काल्याचे किर्तनातुन समाज प्रबोधन केले. यावेळी आमदार विलास भुमरे, यांची प्रमुख उपस्थिती होती , कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन संजय दौंड टेलर यांच्यावतीने करण्यात आले होते, सप्ताह यशस्वी करण्यासाठी मनोज पेरे , सरपंच अशोक धर्मे , काकासाहेब टेके , किरण गुजर, पत्रकार नंदकुमार वैद्य, किसानलाल तोतला,अंकुश काळे,राजाराम खरात , मधुकर सोकटकर, मनोज मुंडलिक , सागर फरताळे , कांता डोळस , अंकुश धर्मे , राहुल ठाणगे, कल्याण शिंदे, ज्ञानेश्वर कांबळे,बजरंग दल बिडकीन कार्यकर्ते आदींसह अनेक भाविकांनी परिश्रम घेतले. या आठ दिवसाच्या सप्ताह प्रसंगी बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी यावेळी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## शहरातील धोकादायक इमारती पडणार ! मुख्याधिकाऱ्यांनी मारला शहरात फेरफटका



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१६ मार्च - कन्नड शहरातील जीर्ण बांधकाम असलेल्या धोकादायक इमारतींना पाडण्यासाठी नगरपालिका आता नोटिसा बजवणार आहे

शनिवार रोजी तहसीलदार तथा मुख्याधिकारी विद्याचारण कडवकर यांनी शहरात फेरफटका मारत शहरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या,यावेळी शहरातील जीर्ण इमारती धोकादायक स्थितीमध्ये असून त्या पाडण्यासाठी मालकांना नोटीस देणार आहे,धोकादायक इमारतींमुळे मालमत्ताधारक तसेच आजूबाजूच्या नागरिकांच्या जीवाला धोका असून त्यामुळे त्या इमारती मालकांनी स्वतः पाडुन घेण्यात याव्या अशा प्रकारची सूचना नोटिस देण्यात येणार आहे,

शहरातील स्वच्छता बाबत मुख्याधिकारी यांनी सांडपाण्याच्या टाक्या तपासण्यासाठी कर्मचाऱ्यांना सूचना केल्या आहेत,त्यामुळे ज्या सांडपाण्याच्या टाक्या खराब आहेत किंवा भरलेल्या आहेत त्याचा उपसा करण्यात येणार आहे,

यावेळी मुख्यधिकारी यांनी नागरिकांसोबत संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेत त्या सोडवण्यासाठी तत्काळ कर्मचाऱ्यांना सूचना केल्या आहे

## लिहा खेडी येथे शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.१६, लिहाखेडी ता. सिल्लोड येथे उद्या सोमवार ( दि.१७ ) रोजी उभारण्यात येणाऱ्या रयतेचे राजे, छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळ्याचे आज सिल्लोड शहरात ढोल ताशांचा गजरात आगमन झाले. लोकनेते आ. अब्दुल सत्तार यांच्या जनसंपर्क कार्यालय सेना भवन समोर सदरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास आ.अब्दुल सत्तार यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून तसेच पुष्पवृष्टीने जंगी स्वागत करण्यात आले. या वेळी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने परिसर दुमदुमले गेला होता.

याप्रसंगी कृउबा समितीचे उपसभापती दारासिंग चव्हाण, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, नॅशनल सह. सूतगिरणीचे चेअरमन राजेंद्र ठोंबरे, शिवसेना जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, पं.स. माजी उपसभापती अजीज बागवान, तालुकाप्रमुख मारोती पा. वराडे, सोयगाव शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण, शहरप्रमुख मनोज झंवर, प्रशांत क्षीरसागर, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष दुर्गेश जैस्वाल, आशिष कटारिया, प्रमोद शिंदे, लिहाखेडी येथील रुपेश जैस्वाल, पोपटराव साखळे, अजिनाथ झोंड, गजानन बावस्कर, सीताराम गोरे यांच्यासह गावकरी , शिवप्रेमींची उपस्थिती होती.

## नाथवाड्यातील रांजणाच्या पूजेने नाथषष्ठीचा औपचारिक प्रारंभ

तभा वृत्तसेवा

पैठण दि १६ : संत एकनाथ महाराजांच्या घरी भगवान श्रीकृष्णाने १२ वर्षे श्रीखंड्या हे नाव धारणकरुन ज्या रांजणात पाणी भरले त्या पवित्र रांजणाची पूजा आज गावातील नाथमंदिर येथे उत्साहात संपन्न झाली. संस्थान व सालक-यांच्या वतीने नाथवंशज श्री वेणीमाधव ऊर्फ सरदार महाराज गोसावी, छैय्या महाराज, हरिपंडीत महाराज, मेघशाम महाराज यांनी नागेशगुरु उपाध्ये, सौरभगुरु पोहेकर यांसह ब्रह्मवृंदांच्या मंत्रघोषात पवित्र अशा रांजणाची पूजा केली. या प्रसंगी सालकरी श्री योगिराज महाराज, ज्ञानराज महाराज यांसह विनित महाराज,विठ्ठलबुवा, भगवानबुवा,, श्रीरंगबुवा, मिथिलबुवा, शुभमबुवा, चैतन्यभाऊ, आदींसह शेकडो



भाविकांनी मंदिर परिसर फुलून गेला होता. नाथवंशीय सौ. भाग्यश्री वेणीमाधव गोसावी यांच्या हस्ते प्रथम घागर रांजणात ओतुन पवित्र रांजण भरण्यास प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर नाथवंशीय महिलांसह इतर महिलांनी गोदावरीचे पिवित्र जल रांजणात प्रवाहित केले. दिनांक २० मार्च ते २२ मार्च असा तीन दिवस नाथषष्टी यात्रेचा मुख्य सोहळा पार पडणार असून यासाठी राज्यासह देशभरातील भाविक भक्तांचे पैठणच्या दिशेने आगमन होणार आहे. भाविक भक्तांना सेवा पुरवण्यासाठी खासदार संदीपान भुमरे,नाथ संस्थानचे अध्यक्ष तथा आमदार विलास बाप्पू भुमरे, तहसीलदार दत्तात्रय भारस्कार, नगर परिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक संतोष आगळे,नाथ संस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा पाटील बारे, पोलीस निरीक्षक संजय देशमुख आदी लक्ष ठेऊन आहेत.

## सकाळच्या सत्रातच भरणार सर्व शाळा; दुपारच्या सत्रातील शाळा बंद शिक्षण विभागाचा निर्णय

**सध्या उन्हाचा पारा चांगला तापत आहे.वाढत्या उन्हामुळे दुपारच्या सत्रात भरणाऱ्या शाळांची वेळ बदलण्याची मागणी शिक्षक व पालकांनी जिल्हा परिषदेकडे केली होती.यानुसार शिक्षण विभागाने आता दुपारी ऐवजी सकाळच्या सत्रात सोमवारी (दि.१७)मार्चपासून भरणार आहेत.**

**- रंगनाथ आढाव गटशिक्षणाधिकारी,सोयगाव**

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१६ मार्च : तालुक्यातील वाढते तापमान लक्षात घेता सोयगाव तालुक्यातील सर्व १२० शाळा सोमवारी (दि.१७)मार्चपासून सकाळच्या सत्रात भरवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.सकाळी ७.३० ते दुपारी १२.३० अशी शाळांची वेळ राहणार आहे.हा निर्णय खासगी व्यवस्थापन, जिल्हा परिषद,शाळांना लागू असेल.अशी माहिती गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव यांनी दिली

सोयगाव तालुक्याचे तापमान ३८ ते ३९ अंश सेल्सिअस आहे.येत्या काळात पारा चाळिशी पार करेल,असा हवामान खात्याचा अंदाज आहे.त्यामुळे हा निर्णय घेतला आहे.त्यामुळे विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलासा मिळणार आहे.बहुतेक शाळांमध्ये वर्षभर दररोज सकाळी ११ ते सांयकाळी ५ अशी सहा तासांची शाळा भरवली जाते.त्यामुळे मधल्या दोन सुट्यांचा कालावधी धरून सहा तासांचा अवधी होतो.तो कायम ठेवण्यासाठी सकाळी ७.३० ते दुपारी १२.३० ही वेळनिवडली आहे.ही वेळ निवडताना मधल्या सुट्यांची वेळही कमी केली. त्यामुळे आधीच्या जेवढ्या कालावधीचे अध्ययन आताही होणार आहे.या निर्णयासाठी शिषक संघटनासह पालकांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे मागणी केली होती.उन्हाची दाहकता वाढत असल्यामुळे काही सोयगाव तालुक्यात(दि. १७)मार्चपासून सकाळच्या शाळा भरवणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर येथे बदल केला जाव,असे विद्यार्थी-पालकांसह शिक्षकांचे म्हणणे होते.या मागणीला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने होकार दिला असून(दि.१७ )मार्चपासून सर्व शाळा दुपारच्या सत्रात न भरविता सकाळच्या सत्रात भरवणार आहेत.माध्यमिक विभागाच्या शिक्षण विभागाच्या सूत्रांनी दिली.


## राजा बाजार मंदिराचे पदाधिकारीनी घेतले भगवान चंद्र प्रभु दर्शन घेतले



छत्रपती सभाजीनगर - हडको चंद्रप्रभू खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर येथे सिद्धचक्र विधानाचार्य संजय कुमार यांच्या सानिध्यात होत आहे त्यात हजारो महिला आणि पुरुष यांनी भाग घेतलेला आहे सौ धर्मेंद्रचा मान अरुणा रमेश छाबडा यांना मिळाला आहे रोज सकाळी नित्याभिषेक होऊन विधान दुपार एक वाजेपर्यंत चालत आहे तसेच संध्याकाळी महाआरती पण होते

असे अध्यक्ष कैलास कासलीवाल कार्यकारी अध्यक्ष राजकुमार बड जाते विधान संयोजक संजय कुमार पाटणी खंडाळ्या वाले परीश्र म करत आहे आज राजा बाजार मंदिराचे ट्रस्टी पचायत अ ध्यक्ष महावीर पाटनी सचिव प्रकाश अजमेरा कीरन पहाडे सतोष सेठी अरुण पाटनी महावीर ठोले प्रमोद पाटनी सजय प हाडे चद्रसागर ध मशाळा सचिव श्रेणीक कासलीवाल अजीत लोहाडे रमेश पाटनी निरज बडजाते सूरेखा पाटनी यानी चंद्र प्रभु मंदिरात भगवताचे दशन घेतले त्यांचे स्वागत करण्यात आले समाजबाधव ट्रस्ट अध्यक्ष कैलास कासलीवाल दिलीप लोहाडे राजकुमार बडजाते सगीता बडजाते अमित गंगवाल सुमन गंगवाल रमेश छाबडा अरुणा छाबडा राणी बाकलीवाल सुमीत बाकलीवाल किरण कासलीवाल मीना पापडीवाल ललीता काला सतिष ठोळे डॉ शैलेश चांदीवाल संतोष पाटणी अशोक अजमेरा राजू लोहाडे पंकज काला दिनेश पाटोदी रुपेश छाबडा आशा कासलीवाल कविता अजमेरा अशोक पहाडे संजय पाटणी प्रकाश शेठी ज्योती सेठी पुष्पा गंगवाल पुष्पा ठोळे मंजू पाटणी राहुल कासलीवाल बबलू कासलीवाल नीलिमा ठोळे मीना कासलीवाल रिदम पाटणी पुष्पक बडजाते संगीताकाला अक्षय काला राजश्री कासलीवाल अरुणा ठोळे कल्पना पहाडे सोनाली पांडे कैलास काला मुकेश गंगवाल उज्वला अजमेरा त्रिशला सेठी कांता काला सरला कासलीवाल आदी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (६७) सरसंघचालक

श्री माधव सदाशिव गोळवलकर तथा श्री गुरुजींच्या जीवनात खूप उतार चढाव होते. आईवडिलांच्या आठ लेकरांमध्ये फक्त एक जिवंत होता तो म्हणजे माधव. हा पुत्र सितार आणि वंशी खूप सुंदर वाजवायचा. माधव एम एस सी झाला होता. त्याचे विचार म्हणजे विज्ञान-धर्म आणि संस्कृतीचे सुंदर मिश्रण होते. या माधवने स्वामी अखंडानंदांना गुरु केले होते. परंतु डॉक्टर हेडगेवार यांनी मरते समयी संघाला सांभाळण्याची जबाबदारी तुझी असे माधवला म्हणून, जगाचा निरोप घेतला होता. त्यामुळे आद्यसरसंघचालकांच्या अंतिम इच्छेनुसार माननीय माधवरावजी गोळवलकर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक झाले. ही अशी अद्भुत घटना अशी अप्रतिम पारक अशी दीर्घ दृष्टी असा भरोसा जसा गुरुजींच्याए प्रति डॉक्टर हेडगेवार यांचा होता. तशीच या गुणांची विशेषता गुरुजींमध्ये होती .

पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते असा चरीतार्थ करत गुरुजींनी रा.स्व. संघाचा विस्तार केला आहे

क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## बाल लैंगिक शोषणाबद्दल कला, नाट्य आणि संवादाचा एक अविस्मरणीय दिवस



मुंबई, १५ मार्च २०२५: कला, सामाजिक सक्रियता आणि वकिलीच्या एका शक्तिशाली संगमात, कंट्रोल + ऑल्ट + डिलिट - 'आर्ट दॅट डेअर्स टू स्पीक' - च्या दुसऱ्या दिवशी वेद कुणबा, वर्सोवा, अंधेरी येथे पीडित, तज्ञ, कलाकार आणि परिवर्तन घडवणारे एकत्र आले. साक्षी यांच्या नेतृत्वाखाली एसटीसीआयने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात मुंबई जिल्ह्यात २०२४-२०२५ च्या प्रकल्प रक्षीन अंमलबजावणी टप्प्याचा कळस होता. या उपक्रमाद्वारे ३००० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले आहे, ज्यामुळे बाल लैंगिक शोषणाबद्दल महत्त्वाच्या चर्चांना सुरुवात झाली आहे.

## पैठणला जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायालयाचे उद्घाटन

पैठण दि १६ : पैठण येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या शुभहस्ते झाले. या उद्घाटन सोहळ्यास अतिथी म्हणून उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती न्यायमूर्ती यनशिवराज खोब्रागडे, उच्च न्यायालय मुंबई न्यायमूर्ती संजय देशमुख हे उपस्थित होते. जिल्हा सत्र न्यायालय संभाजीनगरच्या न्यायाधीश श्रीमती विभा इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली पैठण येथे



रविवार दिनांक १६ मार्च रोजी सकाळी १०.०० वाजता दिवाणी व फौजदारी न्यायालय पैठण परिसरात उद्घाटन समारंभ संपन्न झाला. या उद्घाटन समारंभासाठी खासदार संदिपान भुमरे, आमदार विलास बाप्पू भुमरे, माजी आमदार संजय वाघचौरे, मा. मंत्री अनिल पटेल, उपजिल्हाधिकारी निलम बाफना, पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ.सिद्धेश्वर गोरे, तहसीलदार दत्तात्रय भास्कर, पोलीस निरीक्षक संजय देशमुख, नगरपालिका मुख्याधिकारी संतोष आगळे, नगराध्यक्ष सुरज लोळगे , वकील संघाचे ॲड. सुभाष खडसन,प्रवीण निवारे, वैभव चव्हाण, संदीप जाधव,संदीप नाडे, आस्मा खानापुरे, ज्येष्ठ विधीज्ञ अशोक शेवतेकर, सी आर कुलकर्णी, अनिल जोशी, राजेंद्र गोरडे, शकील बागवान, रमेश गव्हाणे, आदिनाथ सानप, सह मोठ्या संख्येने वकील बांधव तसेच विधिज्ञ उपस्थित होते.

### जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचा न्यायालयात.

दि.कि.अर्ज. क्र: १७८/२०२५

पुढील तारीख : २५/०४/२०२५

अर्जदार -बिलकीसबी भ्र. सुप्पड खान पठाण व ईतर

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हा अधिकारी छत्रपती संभाजीनगर.

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड. शुभम रामदास राऊत कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत सुप्पड खान महमदखान पठाण हे दि. २४/०६/२०१३ रोजी घुसूर, हतनुर कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदार हे त्यांचे वारस आहे मयत सुप्पड खान महमदखान पठाण हे मयत झाल्या मुळे त्यांच्या पश्चात वारस म्हणून अर्जदार यांना अत्यावश्यक सरकारी कामासाठी शासनाच्या तहसिल कार्यालय, ग्रामपंचायात कार्यालय, उपअधीक्षक भूमि कार्यालय, गाव, नगर व शहर भुमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय, आर.टी. ओ कार्यालय मध्ये व तसेच सरकारी योजनेचा लाभ मिळणे व अत्यावश्यक कामा साठी वारस प्रमाणपत्र लागत असल्यामुळे सदरील अर्जदार यांच्या हक्कात वारसप्रमाणपत्राची आवश्यक आहे व तशी मागणी अर्जात केली.

त्या अर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटण प्रसिद्ध झाल्या पासून ३० दिवसाच्या आत मे. न्यायालयात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांचा अर्ज मंजूर करून अर्जदार यांच्या हक्कात योग्य तो आदेश करण्यात याईल व तसेच कायदेशीर वारस म्हणून वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात याईल.

सबब हे जाहीर प्रगटण

दिः ११/३/२५

आदेशावरून

लिपिक — सहाय्यक आधिक्षक

दिवाणीव व फौजदारी न्यायालय कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचा न्यायालयात.**

दि.कि.अर्ज. क्र: ११४/२०२५

पुढील तारीख : ०७/०४/२०२५

अर्जदार -: सुमन भ्र. अर्जुन उदासी व ईतर

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हा अधिकारी छत्रपती संभाजीनगर.

अर्ज : १ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड. शुभम रामदास राऊत कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत अर्जुन पिता प्रेमदास उदासी हे दि. ०८/०५/२०२१ रोजी मौजे, देवकी नर्सिंग होम अकोला ता. जि. अकोला येथे मरण पावले आहे. येथे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदार हे त्यांचे वारस आहे. मयत अर्जुन पिता प्रेमदास उदासी हे मयत झाल्या मुळे त्यांच्या पश्चात वारस म्हणून अर्जदार यांना अत्यावश्यक सरकारी कामासाठी शासनाच्या तहसिल कार्यालय, ग्रामपंचायात कार्यालय, उपअधीक्षक भूमि कार्यालय, गाव, नगर व शहर भुमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय, आर.टी. ओ कार्यालय मध्ये व तसेच सरकारी योजनेचा लाभ मिळणे व अत्यावश्यक कामा साठी वारस प्रमाणपत्र लागत असल्यामुळे सदरील अर्जदार यांच्या हक्कात वारसप्रमाणपत्राची आवश्यक आहे व तशी मागणी अर्जात केली.

त्या अर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटण प्रसिद्ध झाल्या पासून ३० दिवसाच्या आत मे. न्यायालयात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांचा अर्ज मंजूर करून अर्जदार यांच्या हक्कात योग्य तो आदेश करण्यात याईल व तसेच कायदेशीर वारस म्हणून वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात याईल.

सबब हे जाहीर प्रगटण

दिः १३/०३/२०२५

आदेशावरून

लिपिक — सहाय्यक आधिक्षक

दिवाणीव व फौजदारी न्यायालय कन्नड

# रिझर्व्ह बँकेकडून अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेस नवीन तीन शाखांना परवानगी

### निलंगा , मुरुड आणि केज याठिकाणी होणार पिपल्स बँकेच्या नवीन शाखा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ मार्च**

अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेस रिझर्व्ह बँकेच्या वतीने नवीन तीन शाखा कार्यान्वित करण्यास परवानगी दिल्याचे पत्र नुकतेच रिझर्व्ह बँकेकडून अंबाजोगाई पिपल्स बँकेस प्राप्त झाल्याची माहिती बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी दिली आहे. यावेळी बँकेचे संचालक प्रा.वसंत चव्हाण, अॅड.विष्णूपंत सोळंके, अरुण काळे, पुरुषोत्तम चोकडा, सुरेश मोदी, अॅड.सुधाकर कऱ्हाड, संकेत मोदी, शेख दगडू भाई दावल, सुधाकर विडेकर, प्रकाश लखेरा, हर्षवर्धन वडमारे, प्रा वनमाला रेड्डी,सौ.स्नेहा हिवरेकर, लक्ष्मण दासूद, सचिन बेंबडे हे उपस्थित होते. १९९६ साली अंबाजोगाई शहरातील व्यापारी तथा नागरिकांची निकड लक्षात घेऊनन अल्पशा भांडवलावर अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेची स्थापना करण्यात आली होती. आज जवळपास सत्तावीस अठ्ठावीस वर्षात बँक ५३७ कोटीच्या ठेवी १९ कोटींच्या भांडवलावर २० शाखांच्या माध्यमातून ग्राहकांना सेवा देत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी सांगितले.

सप्टेंबर २०२४ अखेर बँकेचे वसूल भागभांडवल हे रू १८ कोटी आहे. बँकेचा स्वनिधी हा रुपये ४७ कोटी आहे. राखीव निधी हा १४ कोटी लाख रुपये एवढा आहे. बँकेने रिझर्व्ह बँकेच्या नियमास आधीन राहून ग्राहकांना रु.३२८ कोटी एवढा कर्ज पुरवठा केला असल्याचे बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले. सप्टेंबर २०२४ अखेर बँकेची एकूण गुंतवणूक रु २४३ कोटी एवढी आहे. मागील वर्ष अखेरीस बँकेस करपसच्यात ४ कोटी २० लाखांचा नफा होऊन ०% एन पी ए मिळवला असून लेखा परीक्षण अहवालात प्रतिवर्षी बँकेस अ दर्जा प्राप्त होत आहे. बँकेची ही उंच भरारी पाहता बँकेचे सर्व संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी वृंद तसेच कर्जदार , ठेवीदार व सभासद यांच्या सांघिक कामगिरीमुळे बँकेस हे प्रगतीचे उद्दीष्ट साध्य करता आले असल्याचे मोदी यांनी नमूद केले.

अंबाजोगाई पिपल्स बँक ही आज वीस शाखांच्या द्वारे ग्राहकांना सेवा पुरवीत आहे . नुकत्याच आणखी दोन नवीन शाखां रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेनुसार अंबाजोगाई (चौसाळकर कॉलनी) व छत्रपती संभाजी नगर (सातारा परिसर) येथे सुरू केल्या आहेत. यापुढे पुणे (पिंपरी चिंचवड) व मुंबई याठिकाणी सुद्धा बँकेच्या शाखा सुरू करण्याचा मानस असल्याचे राजकिशोर मोदी यांनी सांगितले. बँकेने खढक्षेत्रात देखील ग्राहकांना तात्काळ सेवा उपलब्ध होण्यासाठी भरीव अशी कामगिरी केली आहे. डिजिटल बँकिंग च्या माध्यमातून UPI, IMPS, RTGS , ATM द्वारे ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी बँक सदैव प्रयत्नशील असल्याने मोदी यांनी यावेळी नमूद केले. बँकेची प्रगती ही बँकेच्या पुढील वाटचालीस नवीन उभारी देणारी असून बँकेच्या सभासदांनी व ग्राहकांनी बँकेवरील विश्वास कायम ठेवल्याची ही पावतीच असल्याचे राजकिशोर मोदी यांनी स्पष्ट केले.

मागील काळात अनेक आर्थिक संस्था डबघाईला येऊन दिवाळखोरी मध्ये निघाल्या. अनेक ठेवीदारांना याचा मोठ्या प्रमाणावर फटका सहन करावा लागला. मात्र अशाही परिस्थितीत अंबाजोगाई पिपल्स बँक ग्राहक ठेवीदार व सभासदांच्या विश्वासाच्या बळावर ताठ मानेने आपला डोलारा पुढे नेत असल्याचा अभिमान संस्थापक राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला. कोरोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभुमीवर देखील कर्जधारक ग्राहकांचा विचार करुन बँकेची आर्थिक स्थिती समाधानकारक ठेवण्यास यश मिळवले. बँकेचे माननिय सभासद, ग्राहक यांचा विश्वास, बँकेचे संचालक मंडळ तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उत्कृष्ट नियोजन व बँकेच्या अधिकारी व कर्मचारी वृंदाचे नियोजनबध्द कामकाज यामुळे बँक दिवसेंदिवस वृद्धिंगत होत असल्याचे दिसून येत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी यावेळी नमूद केले .

अंबाजोगाई पिपल्स बँक केवळ अर्थकारणच न करता वेळोवेळी अनेक समाजोपयोगी कार्यक्रम राबविले असते. ज्यामध्ये शहरातील गुणिजनांचा सन्मान, रक्तदान शिबीर, कोरोना योध्दा सन्मान, बँकिंग क्षेत्रात महिला जनजागृती अशा विविध सामाजिक उपक्रमांच्या यशस्वी आयोजनामुळे व ग्राहकांसाठीच्या नवनवीन उपक्रमामुळे बँक ग्राहकांच्या प्रथम पसंतीस उतरली आहे. यापुढेही अर्थकारणासोबतच वारंवार असेच सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात येतील असा संकल्प राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला.

# दीक्षांत समारंभ हा प्रेरणादायी भविष्याला दिशा देणारा कार्यक्रम




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ मार्च**

भारतीय शिक्षण व्यवस्था ही जगाला स्पर्धा करणारी असून प्राचीन काळापासून नालंदा, तक्षशीला सारखे विद्यापीठे ही जगातील नामवंत लोकांना भारतात शिक्षणासाठी उपयुक्त ठरली. दीक्षांत समारंभ हा प्रेरणादायी भविष्यात दिशा देणारा कार्यक्रम आहे, असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रचे अधिष्ठाता डॉ.संजय साळुंके यांनी केले.

येथील नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३–२०२४ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केली, त्यांना पदवी प्रमाणपत्र वितरण, दीक्षांत समारंभाचे बुधवारी आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.साळुंके हे बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष नवगण शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ.योगेश क्षीरसागर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.किशोर काळे, संस्था प्रतिनिधी डॉ.विश्वांभर देशमाने, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए.एस., उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. साळुंके म्हणाले की, प्राचीन काळापासून माहिती आणि तंत्रज्ञानाच शिक्षण भारतात दिल जात होतं. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात आर्किटेक्चरचे शिक्षण उच्च दर्जाचे होते. भारतीय शिक्षण व्यवस्था ही वैभवशाली दर्जेदार असून आज नवीन शैक्षणिक धोरण सन २०२० हे जगातील शिक्षणाचा ट्रेंड बदलणारे असून प्रत्येकाला आपल्या सोयीनुसार अभ्यासक्रम स्वीकारण्याचा अधिकार मिळालेला असून छोट्या व्यवसायाच्या अनुषंगाने अभ्यासक्रम स्वीकारले जात आहेत. उद्योगांना पुरक असे शिक्षण विद्यार्थ्यांना निवडता येऊ लागलेले आहेत. ते अभ्यासक्रमात घेतले जात असून कोणातेही काम हे उत्तम दर्जाचे आहे. ग्रामीण भारतातील सामाजिक, आर्थिक रोजगाराची संधी निर्माण करणारे शिक्षण आहे.स्पर्धा निर्माण करणारे शिक्षण निर्माण झालेले असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी केले. सुत्रसंचलन डॉ.पांडूरंग सुतार, बळीराम राख यांनी केले. आभार डॉ.संतोष तळेकर यांनी मानले. कार्यक्रमाचा सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमास निदेशक डॉ.भागचंद सानप, एनसीसी कॅप्टन डॉ.बालासाहेब पोटे, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ.यादव घोडके विद्यार्थी प्रतिनिधी शितल चव्हाण यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## दीक्षांत समारोह हा विद्यार्थ्यांच्या सन्मानाचा दिवस : डॉ.योगेश क्षीरसागर

अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे सहसचिव डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, आज विद्यार्थ्यांचा सन्मानाचा दिवस असून नवीन आयुष्यासाठी प्रेरणा देणारा उपक्रम आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना योगदान देण्यासाठीची संधी नवीन शैक्षणिक धोरणानुसार निर्माण झालेली असून नवीन शैक्षणिक धोरण बदलणारे व्यावसायिक प्रशिक्षण देत असून विद्यार्थ्यांने स्वतः व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन सामाजिक, आर्थिक विषमता या विषयांना आवाहन उभे करणारी सुसंकृत पिढी घडविणारी व उद्योजक निर्माण करणारी शिक्षण प्रणालीचा उदय यानिमित्ताने होत आहे. पदवी मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. दीक्षांत समारंभप्रसंगी पीएचडी संशोधक, पदव्युत्तर विभागातील व पदवी विभागातील पदवीधर विद्यार्थ्यांचे दीक्षांत पदवी देऊन मान्यवरांच्या हस्ते पदवी वितरण करण्यात आले.

# खा.सोनवणे यांच्या उपस्थितीत आडसकर यांच्या खंदे समर्थकांचा प्रवेश!

### केज तालुक्यात आडसकर गटाला खिंडार

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१५ मार्च**

केज तालुक्यातील वरपगाव येथील रमेश आडसकर यांचे खंदे समर्थक २० वर्ष सेवा सहकारी सोसायटीचे मा. चेअरमन राहीलेले श्री. अंकुश नाना देशमुख व व्हाइस. चेअरमन श्री. अंबरभाई शेख यांनी अँड. बाबुराव देशमुख य्यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्याचे लोकप्रिय खा.मा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश केलाआहे त्यामुळे केज तालुक्यात आडसकर गटाला खिंडार पडताना दिसत आहे अनेक वर्षे आडसकर गटा सोबत काम करणारे कार्यकर्ते रमेशराव आडसकर यांना सोडुन जाताना दिसत आहेत कारण आडसकर यांनी चिंचोली माळी जिल्हा परिषद अनेक वर्षे चालवली परंतु कवडीचा पण विकास त्यांना करता आला नाही. परंतु



खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी पाच वर्षे चिंचोली माळी जिल्हा परिषदेवर काम केले पन भरघोस विकास निधी चिंचोली माळी जिल्हा परिषद सर्कल मध्ये दीला व आडसकर यांनी २५ वर्षात जो विकास चिंचोली माळी जिल्हा परिषद सर्कल मध्ये केला नाही त्यापेक्षा दुप्पट विकास खासदार बजरंग बप्पा सोनवणे चिंचोली माळी जिल्हा परिषद सर्कल मधुन निवडुन आल्यानंतर पाच वर्षांत केला आहे त्यामुळे रमेश आडसकर यांच्या वर चिंचोली माळी सर्कल मधील जनता नाराज होऊन आज रमेश आडसकर यांचे खंदे समर्थक सुध्दा रमेश आडसकर यांना सोडुन जाताना दिसत आहेत त्यांचाच एक भाग अंकुश नाना देशमुख व अंबरभाई शेख यांनी रा.कॉ.प.शरद पवार साहेब यांच्या पक्षात प्रवेश केला यावेळी उपस्थित लक्ष्मण देवकर , विनायक कापरे, बाबासाहेब नरहरी देशमुख ,सुनिल देशमुख ,संभाजी शितोळे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# कृषी केंद्र चालकाची बॅग चोरी

### व्यापाऱ्यांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ मार्च**

शहरातील जुना मोंढा येथील बळीराजा ग्रो एजन्सीचे मालक अण्णाभाऊ साठे चौकात कामासाठी थांबले होते. त्यांच्या कार मध्ये ठेवलेली कॅशबॅग कारच्या काचा फोडून चोरट्यांनी लंपास केली आहे. या घटनेमुळे व्यापारी वर्गामध्ये भीतीचे वातावरण तयार झाले असून या विरुद्ध कारवाई करण्याचे निवेदन व्यापाऱ्यांनी पोलीस अधीक्षकांना दिले आहे.

जुना मोंढा येथील बळीराजा ग्रो एजन्सीचे केदारनाथ शहीर हे शहरातील अण्णाभाऊ साठे चौकात (दि.१) मार्च रोजी रात्री कामासाठी गाडी बाजूला लावून थांबले असता त्यांच्या कार मध्ये ३ लाख रुपये असलेली कॅशबॅग कारच्या काचा फोडून चोरट्यांनी लंपास केली आहे. अशा प्रकारे होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे शहरातील व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे अशा चोरट्यांचा पोलिसांनी बंदोबस्त करावा तसेच केदारनाथ शहीर यांचो चोरी केली रक्कम याचा तपास करावा या मागणीचे निवेदन बीड पोलीस अधीक्षकांना व्यापाऱ्यांच्या वतीने देण्यात आले आहे.

# परमेश्वर सातपुते यांना फक्त जिल्हाप्रमुख पदावरून मुक्त केले

### शिवसेना पक्षातून हकालपट्टी झालेली नाही

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ मार्च**



परमेश्वर सातपुते यांच्या जिल्हाप्रमुख पदाला तूर्तास पक्षश्रेष्ठीकडून स्थगिती देण्यात आली आहे शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या पुढील आदेशापर्यंत प्रभारी जिल्हाप्रमुख म्हणून अन्य व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली आहे.

परंतु काही विरोधकांनी परमेश्वर सातपुते यांची पक्षातून हकालपट्टी झाली अशी बातमी प्रसार माध्यमांवरती प्रसारीत केली आहे परंतु असे नसून परमेश्वर सातपुते यांना फक्त जिल्हाप्रमुख पदावरून मुक्त केले आहे शिवसेना पक्षातून हकालपट्टी झालेली नाही.

यामुळे प्रभारी म्हणून दुसऱ्याकडे जबाबदारी दिली जरी असली तरीही लवकरच या संदर्भात पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांची भेट घेऊन या संदर्भात सविस्तर चर्चा करणार असल्याचे परमेश्वर सातपुते यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

# सौ.के.एस.के.महाविद्यालयात शास्त्रीय संगीत महोत्सव कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ मार्च**

दिनांक १५ मार्च २०२५ रोजी नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील संगीत विभागाच्या वतीने शास्त्रीय संगीत महोत्सवाचे आयोजन संस्थेच्या उपाध्यक्ष मा.डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरूवात संस्थेचे प्राशसकिय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए.एस.,कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे,प्रा.पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर यांच्या हस्ते उदघाटन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.या महोत्सवामध्ये शास्त्रीय ते आजपर्यंतच्या यशस्वीतेचा



संगीत,गायन,नाट्यगीत व उपशास्त्रीय संगीत,गझल अशा विविध गीत प्रकाराचे सादरीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर यांनी आपल्या मनोगतामधून संगीत विभागाची सुरूवात लेखाजोखा मांडला.संगीत महोत्सवामध्ये देवयानी वाघमारे,श्रृष्टी आनेराव, कैवल्य सुरवसे,अमर मोरे,सुभाष शिंदे,विजय कोरडे,सिध्देश्वरी कोकाटे, अश्विनी कोकाटे,शिवांगीनी गाडे, श्रीकांत देशमुख,पवन शिंदे,आदीत्य दुनगु या विद्यार्थ्यांनी ख्याल गायन,गझल गायन व नाट्यगीत गायन सादर केले. या कार्यक्रमाची साथसंगत रविंद्र दादर, व पवन शिंदे,प्रा.इंद्रजीत भांगे यांनी केली.

तसेच प्रा.इंद्रजीत भांगे यांनी राग शंकरातील बंदिश सादर केली. तसेच प्रा.राहूल सोनवणे घारगावकर यांनी रागजोग गाऊन या मैफलीची उंची वाढवून कार्यक्रमाची सांगता केली.

संगीत महोत्सवाच्या यशस्वीतेमध्ये संगीत विभागाचे प्रा.दीपक जमधाडे,प्रा. सुरेश थोरात यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन प्रा.राहूल सोनवणे, तर आभार प्रा.दीपक जमधाडे यांनी केले.

या कार्यक्रमास आदी सह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच संगीत विभागातील विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते.

# अंबाजोगाईत झाली महिला मॅरेथॉन युवती, महिलांचा मोठा प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ मार्च**

येथील रोटरी क्लब, इनरव्हील क्लब व रोटरॅक्ट क्लब आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले महिला पतसंस्थेच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सकाळी आयोजित केलेल्या महिला मिनी मॅरेथॉन स्पर्धेला महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

राष्ट्रीय खेळाडू व नायब तहसीलदार स्मीता बाहेती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पतसंस्थेच्या अध्यक्षा सुनिता मोदी, डॉ.सुलभा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी चौकात मिनी मॅरेथॉनला प्रारंभ करण्यात आला. संत भगवानबाबा चौकात विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्य हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.पाचवी ते दहावी गटात प्रणिता माने प्रथम, सोनल भिवगुडे द्वितीय, अंजली केंद्रे तृतीय व अनुष्का करंडेला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

आठरा ते पंचेवीस वयोगटात वैष्णवी गडदे प्रथम, सुप्रिया चिरके द्वितीय, तनुजा देशमुख तृतीय व वैष्णवी कोल्हापूरे उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले.सव्वीस ते एकोणपन्नास वयोगटात डॉ प्रिया तिडके प्रथम, सीमा उणवणे द्वितीय, सारिका नायबळ तृतीय व ललीला मगर यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

पन्नास ते सत्तर वयोगटात सविता पाटील प्रथम, उषा यादव द्वितीय , कल्पना लोहिया तृतीय व अनिता शेटकार यांना उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले.पारपर्धेसाठी पंच म्हणून क्रीडा शिक्षक शिवकुमार निर्मळे, क्रीडा समन्वयक दत्ता देवकते, मनेश गोरे यांनी काम पाहिले. रोटरीचे कल्याण काळे, प्रविण चोकडा, संजय सुराणा,राजेंद्र घोडके, ओमकेश दहीफळे, गणेश राऊत, डॉ निशिकांत पाचेगवकर, प्रकल्प संचालक स्वरूपा दिग्रसकर, डॉ.कलपना मुळावकर, मंजुषा जोशी, जगदीश जाजू, रुपेश रामावत, इनरव्हीलच्या सुरेखा सिरसाट, संगीता नावंदर, अंजली चरखा, अंजली निर्मळे, रेखा तळणीकर, रोटरॅक्टचे जतीन कर्नावट, सर्व्हेश बजाज, परदेशी व इतरांनी सहकार्य केले.

# वनसंरक्षणाच्या प्रभावी कामाबद्दल उपवन संरक्षक अमोल सातपुते यांना रजत पदक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ मार्च**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील उपवन संरक्षक अमोल सातपुते यांनी बीड जिल्ह्यात वन अधिकारी म्हणून काम करतांना २०२० ते २१ मध्ये केलेल्या वनसंरक्षणाच्या प्रभावी कामाबद्दल राज्याच्या वन विभागाने रजत पदक जाहीर केले आहे.

बीड जिल्ह्यात सन २०१६ ते २०२१ मध्ये जिल्हा वन अधिकारी म्हणून अमोल सातपुते हे कार्यरत होते. या काळात जिल्ह्यातील २७० एकर वन क्षेत्रातील अतिक्रमण हाटवुन येथे पुन्हा वनीकरण केले होते. त्याच बरोबर जिल्ह्यातील ५० ठिकाणच्या ११० एकर क्षेत्रात मियावाकी पध्दतीने घनदाट वनांची निर्मिती करून तेथील स्थानिक जैवविविधता संवर्धनाचा यशस्वी प्रयत्न केला होता. वृक्षारोपण संगोपनासाठी दुष्काळी बीड जिल्ह्यातील २७ ठिकाणी फिरत्या सौर ट्रॉली तंत्राचा वापर करून ग्रीन बेल्टची निर्मिती केली होती. त्याच बरोबर बीड जिल्ह्यातील वनक्षेत्रात वन्यजीवांसाठी ३ वर्षात १२० पाणवठे तयार केले व शिकारीवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्ह्यात प्रथमच कॅमेरा ट्रॅपचा वापर केला.वन विभागाकडून राज्यात वनसंपत्तीचे सरंक्षण



व संवर्धनाचे काम प्रभावीपणे करणाऱ्या अधिकाऱ्यांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी व त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल प्रोत्साहीत करण्यासाठी राज्यस्तरावरून पदके दिली जातात.या पदकासाठी सध्या जुन्नर येथे कार्यरत असलेले अमोल सातपुते यांची राज्यस्तरीय पदक निवड समितीने रजत पदकासाठी निवड केली आहे. या निवडीबद्दल उपवन संरक्षक अमोल सातपुते यांचे अभिनंदन होत आहे.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात जनआंदोलनाचा इशारा

### तुळजापुर शहरातील ड्रग्ज विक्री सुरूच...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ मार्च -**

तुळजापूर शहर मागील काही दिवसापासून ड्रग्स तस्करी प्रकरणात संपूर्ण महाराष्ट्रात चर्चेत आले आहे. तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी चाललेल्या ड्रग्स तस्करीचा जनसामान्यातून होणारा विरोध हळूहळू समोर येत आहे.

शहरात सुरू असलेल्या ड्रग्स प्रकरणाला आळा घालण्यासाठी तुळजापूर मधील सर्व पक्ष सामाजिक संघटना समाजसेवक आणि विविध मंडळ यांची बैठक दि.१५ मार्च रोजी सायंकाळी येथील जनहित संघटनेच्या कार्यालयात पार पडली.

बैठकीनंतर उपविभागीय पोलीस अधीक्षक डॉ. निलेश देशमुख यांना निवेदन देण्यात आले. सदरील निवेदनात तपासाला गती नाही आली तर सर्व तुळजापूरकर मिळून जनआंदोलन उभे करू असा इशारा देण्यात आला.

निवेदनावर भाऊ भांजी, अमोल कुतवळ, अजय साळुंके, राहुल खपले, अमर परमेश्वर, ऋषिकेश मगर, विजय भोसले, ॲड. धीरज पाटील, शाम पवार, महेश चोपदार, अक्षय परमेश्वर, लक्ष्मण नन्नवरे, किशोर दरेकर, बालाजी जाधव, बापूसाहेब भोसले, वैजनाथ पुजारी, उत्तम अमृतराव आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...



### मल्हारराव होळकर जयंतीनिमित्त अभिवादन

**तेर, दि.१६ मार्च -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे मल्हारराव होळकर जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित सरपंच दीदी काळे, उपसरपंच श्रीमंत फंड, ग्रा.पं.सदस्य प्रविण साळुंखे, नवनाथ पसारे, बापु नाईकवाडी, गोरोबा पाडुळे, संजय लोमटे, नामदेव कांबळे, सचिन देवकते, तानाजी पिंपळे, किरण फंड, हरी भक्ते, बाबासाहेब चादरे, केशव सलगर, महेश भिसे, मच्द्रि देवकते, अविनाश खांडेकर, लोकेश काळे, बाळासाहेब रसाळ आदी उपस्थित होते.

### अध्यक्षपदी पांडागळे यांची निवड

**तुळजापूर, दि.१६ मार्च -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंतीउत्सव समितीच्या अध्यक्षपदी वैजनाथ पांडागळे तर मि



रवणूक प्रमुख पदी अमोल कदम यांची एकमताने निवड करण्यात आली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे मराठवाडा उपाध्यक्ष तानाजी कदम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत जयंतीनिमि त्त घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमा संदर्भात चर्चा करण्यात आली. जयंती उत्सव समितीची उर्वरित निवडीमध्ये उपाध्यक्षपदी आप्पा कदम, सचिव म्हणून सोनु कदम, कोषाध्यक्षपदी रवि वाघमारे तर चंचल कदम, अरुण कदम यांची सर्वानुमती निवड करण्यात आली.




### लोककल्याण संस्थेच्या पाणपोईचा शुभारंभ

**जळकोट, दि.१६ मार्च -**

कोराळ (ता. उमरगा) येथे संत तुकाराम महाराज बीजोत्सवानिमित्त प्रत्येक वर्षी लोककल्याण बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने पाणपोई सुरू केली जाते. सद्यस्थितीत उन्हाची तीव्रता वाढल्याने गावात संत तुकाराम महाराज बीजनिमित्त आलेल्या गावातील अन् बाहेरगावातील भाविक भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी. यासाठी रविवार (दि.१६) रोजी थंड व शुद्ध पाण्याच्या पाणपोईचा शुभारंभ करण्यात आला. या बीजोत्सवानिमित्त सुरू करण्यात आलेल्या पाणपोईचा शुभारंभ अशोक दासमे व परमेश्वर जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी रवि दासमे, विष्णु साळुंखे, किरण दासमे, विष्णु भगत, राजेंद्र जवळगे, दिलीप सुरवसे, अशोक पवार, संभाजी सुरवसे, विक्रम दासमे, बळीराम सुरवसे, गणेश जाधव, रामकृष्ण दासमे, प्रकाश जंगाले, परमेश्वर सुरवसे, बालाजी शिंदे, गोविंद कोळी, संभाजी जंगाले आदी सदस्य, नागरिक उपस्थित होते.

### अध्यक्षपदी शिंदे तर सचिवपदी कांबळे

**लोहारा, दि.१६ मार्च -**

लोहारा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी प्रितम शिंदे यांची तर उपाध्यक्षपदी संदीप कांबळे, तर सचिवपदी ऋषिकेश कांबळे यांची सर्वोनुमते बिनविरोध निवड करण्यात आहे. यामध्ये अध्यक्षपदी प्रितम शिंदे, उपाध्यक्षपदी संदीप कांबळे, सचिवपदी ऋषिकेश कांबळे, कोष्याध्यक्षपदी सुमित कांबळे, मिरवणूक प्रमुखपदी योगेश वाघमारे, विनोद थोरात, अतुल कांबळे, अमरजित महालिंगे, अक्षय गायकवाड, मिलिंद नागवंशी, दिगंबर कांबळे, तुळजाराम कांबळे, भागवत गायकवाड, आदींच्या निवडी करण्यात आल्या आहेत.

# टवाळखोरांच्या नियंत्रणासाठी वैद्यकीय महाविद्यालयात सहा पोलिसांचे पथक

**आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिले होते निर्देश... पोलीस प्रशासनाची कार्यवाही...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ मार्च -**

सर्वसामान्य रुग्णांना दर्जेदार आणि तातडीने तज्ञांच्या निगराणीखाली उपचार उपलब्ध व्हावे यासाठी आपण मोठा पाठपुरावा करून हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू केले आहे. मात्र त्याठिकाणी रुग्णांना दिलासा देण्यासाठी कर्तव्यावर असलेल्या वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी बांधवांना काही समाजकंटक वेठीस धरत असल्याच्या घटना समोर आल्या होत्या. त्यानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात तातडीने पोलिसांचे पथक तैनात करून आरोग्य कर्मचाऱ्यांना वेठीस धरणाऱ्या समाजकंटकांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना आ. पाटील यांनी दिल्या होत्या. त्यानुसार आता सहा पोलिसांचे पथक तैनात करण्यात आले असून याउपरही कोणाला जाणीवपूर्वक त्रास दिला गेल्यास आपल्या निदर्शनास आणून द्यावे असे आवाहन आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.



समाजकंटकाकडून त्रास होत असल्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलनाचा इशारा दिला होता.

त्या पार्श्वभूमीवर आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसराला ८ मार्च रोजी भेट देऊन सुरक्षेचा आढावा घेतला. वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, रुग्ण तसेच रुग्णांचे नातेवाईक यांना जर कोणी नाहक त्रास देत असेल तर आपण हे कदापि सहन करणार नाही अशा शब्दात त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी स्वप्नील राठोड यांना सुनावले होते. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय परिसरात उपद्रव माजविणाऱ्या समाजकंटकांचा तात्काळ कायदेशीर मार्गाने बंदोबस्त व्हायलाच हवा आशा शब्दात आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिलासा देत समाजकंटकांवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याचे पोलीस प्रशासनाला निर्देश दिले होते.

रुग्णालय परिसर आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपद्रव माजविणाऱ्या या समाजकंटकांवर तातडीने योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिल्यानंतर पोलीस प्रशासन आता कामाला लागले आहे. आपण दिलेल्या सूचनेनुसार उपविभागीय पोलीस अधिकारी स्वप्नील राठोड यांनी वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा रक्षक, रुग्ण तसेच रुग्णांच्या नातेवाईकांना कोणत्याही प्रकारचा उपद्रव या समाजकंटकांकडून होऊ नये म्हणून सहा पोलीस कर्मचाऱ्यांचे एक पथक तैनात केले आहे.

तसेच दिवस व रात्रीच्या गस्ती पथकांच्या फेऱ्या देखील सुरू केल्या आहेत. रात्री-अपरात्री होणाऱ्या त्रासाला यामुळे आता नक्की आळा बसेल. पोलिसांचे पथक तैनात केल्यानंतरही या उपद्रवी समाजकंटकांकडून जाणीवपूर्वक पुन्हा त्रास सुरू झाल्यास अजिबात न घाबरता आपल्या निदर्शनास आणून द्यावे, असे आवाहनही आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे. तसेच पोलीस प्रशासनानेही सर्वसामान्य नागरिक आणि कर्मचाऱ्यांसोबत गैरवर्तन होणार नाही याची गांभीर्याने काळजी घ्यावी असेही त्यांनी सांगितले आहे.

या कामात कुचराई झाल्यास आपण कदापि सहन करणार नाही अशी तंबीही आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

## मल्हारराव होळकर यांच्या जयंती निमित्त जाधववाडी येथे अभिवादन

**डॉ. स्नेहाताई सोनकाटे यांची उपस्थिती...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ मार्च -**

जाधववाडी (ता.जि. धाराशिव) येथील राजे महाराज मल्हारराव होळकर चौकामध्ये पराक्रम, शौर्य आणि न्यायाचे प्रतीक असलेल्या श्रीमंत मल्हारराव होळकर यांना जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला डॉ. स्नेहा सोनकाटे यांनी पुष्पहार घालुन अभिवादन केले.

यावेळी बोलताना डॉ. स्नेहा सोनकाटे म्हणाल्या की, मराठा साम्राज्याच्या विस्तारासाठी आणि हिंदवी स्वराज्याच्या रक्षणासाठी त्यांनी दिलेले योगदान अमूल्य आहे. त्यांच्या अद्वितीय पराक्रमाची गाथा आजही आपल्याला प्रेरणा देते, असे त्या म्हणाल्या.

यावेळी लिंबराज डुकरे, संतोष वतने आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## सर्व आरोपींचा सीडीआर तपासा : ॲड. धिरज पाटील



**एसआयटी समिती नेमण्याची मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ मार्च -**

गेल्या दोन महिन्यापासून सुरु असलेल्या तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात मुख्य सुत्रधार सापडत नाहीत. अनेकांवर कारवाई होवूनही तुळजाभवानी मातेच्या पुण्य पावन नगरीत ड्रग्ज विक्री सुरुच असून तीर्थस्थानाला ही काळीमा आहे. तुळजापूर तालुक्यात सुरु असलेले हे रॅकेट मुळासकट नष्ट करण्यासाठी सर्व आरोपींचे सीडीआर तपासून खऱ्या सुत्रधाराला अटक करण्याची मागणी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. धीरज पाटील यांना आयोजित पत्रकार परिषदेत केली.

यावेळी कृउबाचे संचालक उमेश निंबाळकर, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पाटील, शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, ज्येष्ठ नेते खलील सय्यद, कानिफनाथ देवकुळे, संजय गजधने आदींची उपस्थिती होती.

पुढे ॲड. पाटील म्हणाले की, तुळजापूर तालुक्यातील ५०० युवक ड्रग्जच्या आहारी जावून व्यसनाधिन झाले आहेत. त्याची पाळेमुळे ग्रामीण भागातही पसरली आहेत. सोलापूर आणि मुंबई येथे कारवाई झाल्यानंतरही ड्रग्जची विक्री राजरोसपणे सुरु असून आता या ड्रग्ज विक्रेत्यांना बार्शी येथून पुरवठा होत आहे. मुंबई येथून विकत घेतलेल्या पेडलरच्या खात्यावर तुळजापूर शहरातून मोठ्या प्रमाणात आरटीजीएस आणि फोन पे व्यवहार झाले आहेत. या दोषी आरोपींवर कारवाई करुन त्या न पकडण्यात आलेल्या चार आरोपींची नावे सार्वजनिक करावीत, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली आहे. तसेच ते म्हणाले, मुंबईतील मुख्य सुत्रधार संगिता गोळे या महिलेच्या खात्यावर झालेले व्यवहाराच्या अर्ध्या रक्कमेचे व्यवहार हे केवळ तुळजापूर येथून झाले आहेत. यात व्यवहार झालेल्या व्यक्तींनाच केवळ आरोपी बनिवण्यात आले आहे. मात्र, त्या महिलेस कॉल केलेल्या व्यक्तींना आरोपी करण्यात आले नाही.

आरोपी हे तुळजापूर येथीलच आहेत. तुळजापूर ड्रग्ज प्रकरणातील आरोपी हे तुळजापूरचे भाजपचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांचे निकटवर्तीय असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला आहे. गुन्ह्यात अटक आरोपी हे भाजपशी संबंधित आहेत. तसेच ती आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या सोबत दिसताहेत.

याप्रकरणी गृहमंत्री, गृहराज्यमंत्री यांची भेट घेवून कारवाईसाठी निवेदन देण्यात येणार आहे. तसेच प्रकरणाची पाळेमुळे उखडून काढण्यासाठी तुळजापूर बंदसह जनआंदोलन उभारणार असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

## गायरान वहितीधारकांचे आ. तानाजीराव सावंतांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१६ मार्च -**

मराठवाड्यातील सरकारी गायरान वन जमिनींवरील वहितीधारकांच्या हक्कांसाठी जन संसद व जाणीव संघटना यांच्या वतीने एक महत्त्वाचे निवेदन आमदार तानाजी सावंत यांना सादर करण्यात आले आहे.

या निवेदनात विशेषत: भूमिहीन व अनुसूचित जाती-जमातींतील लोकांनी १९७८ पूर्वीपासून गायरान जमिनीत पिकवलेल्या धान्याचा उल्लेख करत त्यांचे शाश्वत उपजीविकेचे साधन म्हणून त्या जमिनीकडे पाहिले आहे.

तसेच, १९९१ साली महाराष्ट्र शासनाने भूमिहीन आणि अनुसूचित जाती-जमातींना सरकारी गायरान वनजमिनीवरील वहितीचे हक्क देऊन त्यांना सातबारा दिला होता.

तथापि, अनेक कुटुंबं सातबारा मिळवण्यात वंचित राहिलीत आणि सरकारी गायरान जमिनीवर खाजगी कंपन्यांनी कब्जा करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. महाराष्ट्र शासनाने १२ जुलै २०११ रोजी काढलेला परिपत्रक सर्वोच्च न्यायालयाच्या २०११ च्या निर्णयाच्या अनवयार्थ लागू करण्यात आले आहे. या निर्णयानुसार फक्त भूमिहीन व अनुसूचित जाती-जमातींना विशेष बाब म्हणून अतिक्रमण करणाऱ्या जमीन धारकांना समाविष्ट करून त्यांना न्याय दिला जातो. मराठवाड्यातील गायरान जमिनींवर खाजगी कंपन्यांच्या प्रकल्पांची स्थापना रोखली जावी, असे या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

हे प्रकल्प दांडगाई व बळाचा वापर करून वहिती धारकांना हुसकावून लावण्याचे काम करत आहेत, ज्यामुळे भविष्यात मोठा संघर्ष होण्याची शक्यता आहे.

निवेदनात पुढे नमूद केले की, महाराष्ट्र शासनाने १९५४ च्या हैदराबाद परिपत्रकाची तात्काळ अंमलबजावणी केली पाहिजे. १९९१ च्या परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी व्हावी आणि मराठवाड्यातील सरकारी गायरान जमिनांसाठी दप्तरातील नोंदी ग्राह्य ठरवाव्यात, अशी मागणी जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे व तालुकाध्यक्ष शेषराव गाडे यांनी केली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर व वीर महाराणा प्रताप यांच्या जयंतीचे आयोजन



**जयंती महोत्सवानिमित्त कार्यक्रम...**

दि.१७ मार्च रोजी सायं. ५ वा. भवानी चौकात बाल गट आणि खुला गटांसाठी भव्य नृत्य स्पर्धा. दि. ८ मार्च रोजी सायं. ६ वा. लातुर येथील शिवशाहीर संतोष साळुंके यांचा 'पोवाडा व शाहीर महाराष्ट्राचा' कार्यक्रम. दि.२० मार्च रोजी दुपारी ४ वा. तीन महापुरुषांच्या प्रतिमांची भव्य मिरवणूक काढण्यात येईल.

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ मार्च -**

नळदुर्ग येथे दि.१६ ते २० मार्च या कालावधीत हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर महाराज आणि वीर महाराणा प्रतापसिंह यांच्या संयुक्त जयंतीचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. यंदा ही जयंती एकत्रितपणे साजरी केली जात असून, यानिमित्त विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.१६ मार्च रोजी सकाळी ११ वाजता उमरग्याचे आमदार प्रविण स्वामी यांच्या हस्ते भवानी चौकात या तीन महापुरुषांच्या प्रतिमांचे पुजन होऊन प्रतिमांची प्रतिष्ठापना करण्यात आली. यापूर्वी सकाळी ९ वाजता जयंती महोत्सव समितीच्या वतीने शहरातील महिलांची भव्य शोभयात्रा काढण्यात आली. शोभयात्रेची सुरुवात लोकमान्य वाचनालयातील गणेश मंदिरातून करण्यात आली. या शोभयात्रेत शहरातील विविध समाज घटकांतील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या.

शोभयात्रेमध्ये शिव-बसव-राणा सार्वजनिक जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष संतोष पुदाले, वैभव पाटील, प्रमोद कुलकर्णी, नवल जाधव, शिवय्या स्वामी, नितीन कासार, कमलाकर चव्हाण, ज्ञानेश्वर घोडके, विलास येडगे, अमर भाळे, पद्माकर घोडके आणि इतर विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रविण स्वामी यांच्या हस्ते तीन महापुरुषांच्या प्रतिमांचे पुजन आणि प्रतिष्ठापना झाली. या प्रसंगी शिव-बसव-राणा सार्वजनिक जन्मोत्सव समितीच्या वतीने आमदार स्वामी यांचा सत्कार करण्यात आला.

शिव भक्तांनी या सर्व कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन शिव-बसव-राणा सार्वजनिक जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष संतोष पुदाले यांनी केले आहे.

# जकनी तांडा येथील खडी क्रशरमुळे नागरीक त्रस्त; ब्लास्टिंगमुळे घरांना तडे





**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.१६ मार्च -**

तुळजापुर तालुक्यातील जकनी तांडा येथील खडी क्रशर केंद्रामुळे स्थानिक शेतकऱ्यांना आणि नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या खडी क्रशरमुळे येथील भागात प्रचंड धुळ साचली आहे. तसेच दिवसा-रात्री झालेल्या ब्लास्टिंगमुळे लोकांना मानसिक आणि शारीरिक त्रास होत आहे. जकनी तांडा येथील काही घरांना वारंवार होणाऱ्या ब्लास्टिंगमुळे तडे गेल्याचे स्थानिक नागरीकांचे म्हणणे आहे. यावरून स्थानिक स्तरावर गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.

याठिकाणी गौण खनिजांच्या उत्खननावर संबंधित महसूल विभागाने योग्य रॉयल्टी जमा केली आहे की नाही, तसेच ग्रामपंचायतीला कर भरण्याबाबत किती रक्कम प्राप्त झाली आहे, याची चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. खडी क्रशर सुरू करतांना सर्व विभागाच्या परवानग्या घेतल्या गेल्या का, तसेच खडी क्रशर सुरु करण्यासाठी आवश्यक असलेल्या नियमांचे पालन झाले आहे का, याची सुद्धा चौकशी करण्यात यावी, असे नागरिकांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायतीच्या परवानगीबाबतही प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. खडी क्रशर सुरु करण्यासाठी ग्रामपंचायतीने कोणत्या अटी व शर्ती घालून परवानगी दिली आहे, तसेच खडी क्रशर चालकाने ग्रामपंचायतीला किती कर भरला आहे, याची सुद्धा तपासणी होणे आवश्यक आहे. यावर जिल्हाधिकाऱ्यांकडून तात्काळ तपासणी करण्याची मागणी नागरिक करत आहेत. खडी क्रशरमुळे शेतकऱ्यांच्या पिकांवर, झाडांवर, फळझाडांवर धुळ साचल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांचे पिके नष्ट होण्याच्या कगारावर आहेत. याठिकाणी होणाऱ्या ब्लास्टिंगमुळे स्थानिक घरांनाही तडे गेल्याने वातावरणात तणाव निर्माण झाला आहे. यामुळे स्थानिकांचे जीवन संकटात आले आहे.

तपासणीसाठी जिल्हाधिकारी यांनी तात्काळ खडी क्रशर केंद्राची पाहणी करावी. खडी क्रशरने सर्व नियमांचे पालन केले आहे का, याबाबत तपासणी करून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने जर याचा धोका निर्माण होत असेल, तर या खडी क्रशरला बंद करण्याच्या कारवाईचा आदेश देण्यात यावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# सूर्य नमस्कार पूतळ्यांची तोडफोड प्रकरणी गुन्हा दाखल

## दोन दिवसांपूर्वी नगर पालिका रोडवरील पूतळ्यांची अज्ञातांकडून तोडफोड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मार्च**



शहरातील हिंगोली नगरपरिषद तथा जिल्हा परिषद मार्गावर सुशोभीकरण करून बसविण्यात आलेल्या लाल रंगाच्या फायबरचे माणसाचे सूर्यनमस्कार पुतळ्यांची विकृत व्यक्तीकडून तोडफोड अज्ञातांकडून दि १३ ते १४ मार्चच्या दरम्यान करण्यात आली होती. याप्रकरणी रविवारी नगर पालिकेचे स्वच्छता निरीक्षक आकाश देशमुख यांच्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिंगोली नगर परिषदेच्यावतीने जिल्हा परिषद रस्त्यावर असलेल्या दुभाजकावर सुशोभीकरणांतर्गत लाल रंगाचे फायबरचे माणसाचे सूर्यनमस्कार पुतळे बसविण्यात आले होते. पहाटेच्या समयी या मार्गावर शहरातील अनेक नागरिक मॉर्निंक वॉकसाठी येतात. त्या अनुषंगाने सूर्यनमस्कार पुतळ्यांच्या माध्यमातून त्यांना योग अभ्यास करता यावा तसेच सौंदर्यीकरण व्हावे या दृष्टीने पालिकेच्यावतीने सूर्यनमस्कार पुतळे बसविण्यात आले होते. परंतु गुरुवारी रात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी या दुभाजकावर बसवलेल्या दोन पुतळ्याची मोठ्या प्रमाणात तोडफोड केली. शहरातील विकृत समाजकंटकांच्या मार्फत झालेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होऊ लागला आहे. या संदर्भात मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या आदेशावरून रविवारी दि १६ मार्च रोजी स्वच्छता निरीक्षक आकाश अशोकराव देशमुख यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिस विभाग आता सीसीटीव्हीच्या सहाय्याने या प्रकरणतील आरोपींचा शोध घेत आहे.

शहराचे सौंदर्यीकरण करण्यासाठी तसेच सूर्य नमस्काराचा अभ्यास करण्यासाठी हे पूतळे बसविले होते परंतु विकृत लोकांनी या निर्जीव पूतळ्याला सुध्दा सोडले नाही. पोलिसांनी संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# कळमनुरी येथील रोजगार मेळाव्यात १८९ उमेदवारांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मार्च**



जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर हिंगोली व स्व.देवरावजी कल्याणकर उच्च माध्यमिक विद्यालय, कळमनुरी यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच कळमनुरी येथे पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा तथा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना भरती मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास जिल्ह्यातील दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा व पदवी तसेच पदवीधारक या पात्रतेच्या ३४२ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १८९ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे.

या रोजगार मेळाव्यात महाराष्ट्रातील विविध नामांकीत कंपनीचे उद्योजक उपस्थित होते. तसेच जिल्ह्यात विविध महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देण्यासाठी विविध महामंडळाचे स्टॉल लावण्यात आले होते.

या मेळाव्यात मार्गदर्शन करताना कळमनुरीचे तहसीलदार जीवककुमार कांबळे यांनी उपस्थित युवक-युवतींना प्रत्यक्ष संवाद साधून शासनाच्या विविध योजनाचा लाभ घ्यावा, असे सांगून शासकीय नोकरीमध्ये सहभागी होता न आल्यामुळे खचून न जाता स्वत:चा उद्योग उभारावा किंवा स्वयंरोजगाराकडे वळले पाहिजे, असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष देवरावजी कल्याणकर उच्च माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष डॉ. संतोष कल्याणकर यांनीही उमेदवारांना मार्गदर्शन केले. सहायक आयुक्त डॉ. रा.प्र.कोल्हे यांनी रोजगार मेळाव्याचा हेतू विशद करताना म्हणाले, युवकांनी मेळाव्यामध्ये जास्तीत जास्त सहभाग नोंदवून रोजगार प्राप्त करुन घ्यावा, असे आवाहन केले. तसेच त्यांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, सुशिक्षित बेरोजगार उमेदवारासाठी मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण याची माहिती देत करिअर कसे निवडावे याच्या मार्गदर्शनासाठी मॉडेल करिअर सेंटरची स्थापना जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, हिंगोली या कार्यालयात करण्यात आली असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा पतंगे यांनी केले तर नवनाथ टोनपे यांनी आभार मानले. या कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता हिंगोली या कार्यालयाचे नवनाथ टोनपे, म. ना. राऊत, ना. ज. निरदुडे, र. ला. जाधव, अमोल आडे, अभिजीत अलोने, नवनाथ पतंगे आणि देवरावजी कल्याणकर उच्च माध्यमिक विद्यालय व केंब्रीज स्कूल ऑफ स्कॉलर्स या संस्थेचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त

### दराडे विद्यालयाच्या राधीका अंभोरेचे यश



हिंगोली- भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी राधिका अंभोरे हिने नॅशनल एक्झाम फॉर सायन्स अँड टेक्नॉलॉजी परीक्षेमध्ये हिंगोली जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या विद्यार्थिनीला शाळेतील विज्ञान अध्यापिका सुप्रिया यरमळ यांनी मार्गदर्शन केले. परीक्षेचे आयोजन राजहंस मल्टीपर्पज सोसायटी यांच्या मार्फत केले गेले होते.याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक श्री. जितेंद्र भट्ट व पर्यवेक्षक श्री. तुलसीदास चीलमुल यांनी यशस्वी विद्यार्थिनी राधिका अंभोरे व विज्ञान अध्यापिका सुप्रिया यरमळ यांचा शाळेच्या व संस्थेच्या वतीने सत्कार केला. भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व संचालक यांनी यशस्वी विद्यार्थिनी व अध्यापिका यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन



हिंगोली- येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी तहसीलदार आश्विन माने, नायब तहसीलदार संतोष बोथीकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### औरंगजेबाची कबर हटविण्यासाठी आज बजरंग दल, विश्व हिंदू परिषदेचे धरणे

हिंगोली- छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील औरंगजेबाची कबर हटविण्यासाठी बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेचे राज्यभर दि १७ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन पुकारले आहे. या आवाहनाला साथ देत हिंगोली येथील बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेनेही हिंदुद्वेषी औरंगजेबाची कबर हटविण्यासाठी धरणे आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. सकाळी १०.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करीत राज्य शासनाला औरंगजेबाचे कबर हटविण्याची मागणी निवेदनातून करणार आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी चोख पोलिस बंदोबस्त लावला आहे.

### नागनाथाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

हिंगोली- होळी धुलीवंदन त्यातच शनिवार रविवार असल्याने सलग तीन दिवस सुट्टया असल्याने शनीवारी (ता.१५) आठवे ज्योतिर्लिंग श्री नागनाथ प्रभुच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली होती. नागनाथ देवस्थानाकडून भाविकांसाठी फराळ व पाण्याची व्यवस्था केली आहे. दर्शन घेतल्यानंतर नागनाथ उद्यानाचाही आनंद भाविक घेत आहेत. नागनाथ देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार व्यवस्थापक सुरेंद्र डफळ सुरक्षा गार्ड प्रमुख बबन सोनुने, मुकेश पडोळे, जगदीश दिंडे, देवा देशमुख, प्रवीण गोबाडे, सुरेखा शिंदे, भगवान शिंदे, गणेश जगताप, संजय मोरे, कृष्णा पाटील नागेश माने रामप्रसाद उदगिरे दिवसभर मंदिरात होते.

# खंडणी मागितल्याप्रकरणी पत्रकाराविराधोत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मार्च**

जिल्हा परिषद विभागातील एका अभियंत्याला तुझी डिग्री बोगस आहे. प्रकरण मिटवून घे, नाहीतर तुझ्याविरोधात उपोषणाला बसणार आहे अशी धमकी देत अडीच लाखांची खंडणी मागितल्याची तक्रार अभियंत्याने शहर पोलिस ठाण्यात दाखल केल्यावरून पत्रकारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार जिल्हा परिषद कार्यालयातील विद्युत अभियंता श्यामकांत श्रीरामजी पजई रा हनुमान नगर यांना पत्रकार राजु हरिभाऊ अवचार याने दि १५ मार्च रोजी तुमची डिग्री बोगस आहे. तुम्ही हे मिटवून टाका नाहीतर मी तुझ्या विरोधात उपोषणाला बसणार आहे असे म्हणून अभियंता पजई यांना जुनी नगर पालिका कार्यालयाजवळ ये. त्यानुसार पजई जुनी नगर पालिका येथे गेले असता त्यांनी अवचार यास काय काम आहे असे विचारणा केली असता पत्रकाराने उजव्या हातावर अडीच लाख रूपये पाहीजेत अशी मागणी केली. याप्रकरणी अभियंता पजई यांच्या तक्रारीवरून पत्रकार राजु अवचार याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# आज महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मार्च**

राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समान हक्क व समान संधी असा मूलभूत हक्क दिलेला आहे. त्याअंतर्गत समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे. तसेच त्यांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी किंवा तिसऱ्या सोमवारी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन राबविण्यात येतो. माहे मार्च, २०२५ च्या महिला लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, (दि. १७ मार्च) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कक्ष क्र. एस-७, हिंगोली यांच्या कार्यालयात सादर करावेत. यामध्ये न्याय प्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले, सेवा, आस्थापनाविषयक बाबी, तक्रार निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या व्यासपीठाचा उपयोग आपल्या अडचणी सोडविण्यासाठी करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, यांनी केले आहे.

# अवैध रेती उपसा विरोधात उबाठाचे ढोल बजाओ आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मार्च**

सेनगाव तालुक्यातील अनेक रेती घाटावरुन बेसुमार अवैध रेती उपसा करण्यात येत असून या गंभीर बाबीकडे महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन कायम दुर्लक्ष करीत असल्याच्या निषेधार्थ तहसील कार्यालयात शनिवारी ता १५ रोजी शिवसेना जिल्हाप्रमुख संदेश देशमुख व कार्यकर्त्यांनी ढोल बजाओ आंदोलन केले.

सेनगाव तालुक्यातील अनेक रेती घाटावरुन दररोज रात्री बेसुमार अवैध रेती उत्खनन करून रात्रीस खेळ चाले याप्रमाणे रेतीचा अवैध उपसा करण्याच्या गंभीर प्रकार घडत आहे. हा प्रकार मागील अनेक वर्षापासून सुरू आहे. तालुक्यात शेकडो गोरगरीब घरकुल लाभार्थींची बांधकामे रेती अभावी रखडली आहेत. तालुक्यातील विविध रेती घाटावरुन अवैध रेती उपसा करून चोरटी वाहतूक करणाऱ्या रेती माफिया विरुद्ध कठोर कारवाईची मागणी शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख संदेश देशमुख यांनी प्रशासनाकडे केली होती. मागणीची दखल न घेतल्याने व महसूल व पोलीस प्रशासनाच्या निष्क्रियतेच्या विरोधात ढोल बजाओ आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला होता. शनिवारी ता १५ रोजी दुपारी १२ वाजता शिवसेना जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, शिवसेना कार्यकर्त व घरकुल लाभार्थी यांनी तहसीलच्या आवारात ढोल बजाओ आंदोलन छेडले. अदोंलना दरम्यान अवैध रेती उत्खनन बंद करा, रेती माफियां विरुद्ध कठोर कारवाई करा घरकुल लाभार्थ्यांना मुबलक दरात रेती उपलब्ध करून द्या यासह विविध घोषणाबाजीने तहसील परिसर दणाणून गेला होता.

या आंदोलनात शिवसेना जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, प्रवीण महाजन, प्रकाश पाटील पिंटु गुजर, रवी देशमुख, करण देशमुख, जगदीश पाटील, देवीदास कुदर्गे, वैभव देशमुख, विलास सुतार यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते

जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी सेनगाव तालुक्यातील बेसुमार होणाऱ्या अवैध रेती उत्खननाची गांभीर्याने दखल घेऊन गोरगरीब घरकुल लाभार्थींना मुबलक दरात रेती उपलब्ध करून द्यावी ही प्रमुख मागणी आहे प्रशासनाचे लक्ष केंद्रित करण्यासाठी शिवसेनेच्यावतीने ढोल बजाओ आंदोलन छेडले असुन परिणामी अवैध रेती प्रकारावर अंकुश न बसल्यास जिल्हाधिकारी कार्यालयात शिवसेनेच्या वतीने ढोल बजाओ आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख संदेश देशमुख यांनी दिला आहे.

अवैध वाळू उपसा आणि वाहतुक करणाऱ्यांमध्ये राजकीय पक्षांचेच पदाधिकारी व कार्यकर्ते यांचा समावेश मोठ्या प्रमाणावर आहे. तसेच महसूल विभागातील मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यावर मागील काळात जीवघेणे हल्ले झाल्यामुळे अवैध वाळू उपसा व वाहतुक करणारा माफीया मागील काही काळांपासून बलाढ्य झाला आहे.

# जागतिक महिला दिनानिमित्त आरोग्य शिबीराचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मार्च**

जागतिक महिला दिनानिमित्त दिनांक १६ मार्च २०२५ रोजी स्त्री रोग तज्ञ व संबंधित संघटना तसेच जिल्हा रुग्णालय हिंगोली यांच्या समन्वयातून महिलांसाठी रक्तशय स्तनाचा कॅन्सर व गर्भपिशवीच्या तोंडाचा कॅन्सर यावर शिबिर घेण्यात आले. यामध्ये डॉ अनुप तोष्णीवाल व डॉ श्रुती यांच्या मार्गदर्शनाखाली अंदाजे ४५ मेमोग्राफी व १०० पेक्षा अधिक रक्त चाचण्या करण्यात आला यावेळी प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ मंगेश टेहरे आयएमए अध्यक्ष डॉ राजेश पवार, डॉ. राम मुंढे, डॉ राजेश पवार, डॉ अनुप तोष्णीवाल, डॉ श्रुती तोष्णीवाल, डॉ. दमकोंडावार, डॉ. सराफ, डॉ. भाले, डॉ माधुरी देशमुख, डॉ सराफ, डॉ भारतीया, डॉ. जाधव, बांगर, डॉ आयोध्या मुटकुळे, डॉ बगडीया आदींची प्रमुख उपस्थीती होती. या शिबीराला उत्तम प्रतिसाद मिळाला तसेच शिबीराच्या यशस्वीतेसाठी सर्व स्त्रीरोग तज्ज्ञ महिला डॉक्टर्स तसेच असोसिएशनने परिश्रम घेतले.

# महिला, अल्पवयीन मुलींवर अत्याचाराच्या घटनेने हिंगोली हादरले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मार्च**

हिंगोली जिल्ह्यात बासंबा पोलिस ठाण्यांतर्गत एका गावात विवाहीतेला धमकी देऊन अत्याचार केल्याची घटना घडली. याच पोलिस ठाण्यांतर्गत शेतात थांबलेल्या अल्पवयीन मुलीवर तुझ्याशी लग्न करायचे असे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याची दुसरी घटना घडली तर तिसरी घटना सेनगाव पोलिस ठाण्यांतर्गत एका अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी बासंबा आणि सेनगाव पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. या तीनही घटनांमुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून अत्याचाराच्या घटनांमुळे हिंगोली जिल्हा हादरला आहे.

बासंबा पोलिस ठाण्यांतर्गत एका गावातील विवाहीतेला तिचा पती व मुलास जीवे मारण्याची धमकी देऊन लहु जाधव याने तिच्यावर अत्याचार केला. मात्र सदर घटना घरी कळाल्यानंतर आपला संसार मोडेल या भितीने तिने कुटुंबियांना सांगितले नाही. मात्र याचा गैरफायदा घेऊन लहु जाधव याने बुधवारी दि १२ मार्च रोजी त्या महिलेसोबत झटापट केली. या प्रकरणात त्या महिलेने कुटुंबियांना सांगितल्यानंतर त्यांनी थेट बासंबा पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी लहु जाधव याच्याविरूध्द गुरूवारी दि १३ मार्च रोजी गुन्हा दाखल केला. पुढील तपास सपोनि आडे, उपनिरीक्षक मदन गव्हाणे, जमादार खंडेराव नरोटे करीत आहेत. याच पोलिस ठाण्यांतर्गत एका गावातील अल्पवयीन मुलगी काम असल्यामुळे शेतातच थांबली होती. यावेळी आकाश राठोड हा तरूण त्याठिकाणी आला. त्याने मुलीला तुझ्याशी लग्न करायचे आहे, तू मला आवडतेस असे म्हटले. मुलीने त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून त्याला कुठलाही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे आकाशने त्या मुलीवर बळजबरीने अत्याचार केला. त्यानंतर शेतातून पळ काढला. सदर घटना मुलीने कुटुंबियांना सांगितल्यानंतर बासंबा पोलिसात मुलीच्या तक्रारीवरून आकाशने अनेकवेळा अत्याचार केल्याची तक्रारीत नमुद करण्यात आले असून पोलिसांनी आकाशविरूध्द पोक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

तिसऱ्या घटना सेनगाव पोलिस ठाण्यांतर्गत एका गावातील आखाड्यावरून गौरव करडीले याने एका अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर मुलीस पळवून नेले. याप्रकरणी सेनगाव पोलिस ठाण्यात दि १५ डिसेंबर २०२४ रोजी मुलीस पळविल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. पोलिसांनी या दोघांचाही शोध सुरू केला. अखेर दोघेही दि १२ मार्च रोजी हाती लागले. याप्रकरणात मुलीच्या जबाबावरून गौरवने तिला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेले तसेच तिच्यावर अत्याचार केला. याप्रकरणी गौरवविरूध्द पोक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोनि शालीनी नाईक, उपनि एस बी स्वामी, जमादार सुभाष चव्हाण करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

# गोरठा जळीत कांडातील दोन आरोपींना अटक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१६ मार्च**

उमरी मुदखेड रोडवरील गोरठा शिवारात दि.१२ मार्च रोजी एका अनोळखी व्यक्तीचा जळालेल्या अवस्थेत मृतदेह सापडला होता. या प्रकरणात पोलिसांनी मयताची ओळख पटविण्याबरोबरच या घटनेतील दोन आरोपींना अटक केली आहे.



उमरी परिसरातील गोरठा शिवारात दि.१२ मार्च रोजी एका प्लॅस्टिकच्या टाकीमध्ये ज्वलनशिल पदार्थ टाकून अंदाजे ३० वर्षाच्या एका अनोळखी इसमास जाळून टाकण्यात आले होते. हि बाब उघड झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत माहिती घेतली. दरम्यान पोलिसांनी घटनास्थळी सापडलेल्या कपड्याचे जळालेले तुकडे, अंगठ्या, जळालेले शरीर यावरुन मयताची ओळख पटविणे कठीण असतानाही सीसीटीव्ही कॅमेरे तसेच सर्व पोलीस ठाणे व राज्याच्या सिमेलगत असलेल्या पोलीस ठाण्यातील मिसिंगचे रेकॉर्ड तपासणी केली. दरम्यान हा शोध सुरु असतानाच दि.१५ मार्च रोजी मयताचे नाव साईनाथ विठ्ठल शिंदे असून तो असर्जन येथील रहिवाशी असल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान या प्रकरणात पोलिसांनी अधिक तपास केला असता हा खुन अनैतिक सबंधातून झाला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मयत साईनाथ शिंदे यांच्या वडिलाने उमरी पोलीस ठाण्यात तक्रार देवून साईनाथ शिंदे याचा खुन जित्तू रामसिंघ बघेल व त्याच्या आईने खुन केला असल्याची तक्रार उमरी पोलिसात दिली. यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जित्तू बघेल व त्याच्या आईस ताब्यात घेतले. दरम्यान दोन्ही आरोपींनी साईनाथ शिंदे याचा खुन करुन मृतदेह जाळल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांना उमरी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

हि कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, उमरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अंकुश माने, स्थागुशाचे पोलीस उपनिरीक्षक आनंद बिच्चेवार, पोलीस अंमलदार गंगाधर कदम, प्रकाश मलदोडे, रुपेश दासरवार, संजीव जिंकलवाड, शितल सोळंके, राजकुमार डोंगरे, महेश बडगू, विश्वनाथ पवार, हेमंत बिचकेवार यांच्या पथकाने केली.

# अपघातग्रस्तांना आ. भीमराव केराम यांची तातडीने मदत

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.१६ मार्च**

मोटरसायकलने गावाकडे परत जाताना थारा गावाजवळ भीषण अपघात होऊन गंभीर जखमी झालेल्या तिघांना आमदार भीमराव केराम यांनी तात्काळ घटनास्थळी रुग्णवाहिका पाठविण्यापासून ते आदिलाबाद येथील रिम्स हॉस्पिटलमध्ये उपचार करण्याकामी तातडीने सर्वतोपरी मदत करून सामाजिक बांधिलकी जोपासली असून त्यांच्या या कार्याचे सर्वस्तरातून कौतुक केले जात आहे.

सविस्तर असे की किनवट तालुक्यातील मौजे थारा येथील रहिवासी असलेले तिघेजण १६ मार्च रोजी १० वाजताच्या सुमारास दुचाकीवरून गावाकडे परत जात असताना त्यांचा भीषण अपघात झाला. या अपघाताची माहिती मिळताच आमदार भीमराव केराम यांनी तात्काळ



अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी घटनास्थळी रुग्णवाहिका पाठवून जखमीना गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारकामी दाखल केले. यावेळी आ. भीमराव केराम यांचे जनसंपर्क अधिकारी तथा आरोग्यदूत संतोष मऱ्हसकोल्हे, पवन मडावी, सरपंच अनिल कनाके, दीपक कुडमते, संतोष कनाके, बबलू मिरासे यांनी उपजिल्हा रुग्णालयात जाऊन अपघातग्रस्तांची विचारपूस केली असता तिघांचीही प्रकृती गंभीर असल्यामुळे डॉक्टरांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारार्थ आदिलाबाद हलविण्यास कळविले. दरम्यान तिघांनाही तातडीने आदिलाबाद येथील रिम्स हॉस्पिटलमध्ये पोहोचविल्यानंतर आ. भीमराव केराम यांनी आदीलाबादचे आमदार पायल शंकर यांच्यासी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क केला व अपघाताची माहिती देऊन तातडीने वैद्यकीय उपचार मिळवून देण्यासाठी प्रत्येक पातळीवर सर्वतोपारी मदत केली.

सध्या जखमीवर आदिलाबाद येथे उपचार सुरू असून दोघांची प्रकृती स्थिर आहे तर एकजण अजूनही अत्यवस्थ असल्याचे मऱ्हसकोल्हे यांनी सांगितले आहे. आ. भीमराव केराम यांच्यामुळे थारा येथील अपघातग्रस्तांना तातडीने म्बुलन्स व उपचारकामी सर्वतोपरी सुविधा मिळाली असून प्रत्यक्ष हजर राहून मदतीचा हात दिल्याबद्दल आरोग्यदूत संतोष मऱ्हसकोल्हे व त्यांच्या सहकाऱ्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### व्हॉइस ऑफ मीडिया उपाध्यक्षपदी अनिल डोईफोडे व सचिवपदी सूभाष नाईक

**भोकर**-येष्ठ पत्रकार अनिल डोईफोडे यांनी गेली अनेक वर्ष वर्तमानपत्रातून अन्याय अत्याचार भ्रष्टाचाराच्या विरोधात प्रखड लीखान केले. ४४ देशांमध्ये कार्यरत असलेली पत्रकारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशिल असणारी व्हॉइस ऑफ मीडिया या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे व जिल्हाध्यक्ष गणेश जोशी यांनी अनिल डोईफोडे यांना तालुका उपाध्यक्षपदावर निवड करुन जिल्हा ग्रामीण सचिव पदी सूभाष नाईक यांची निवड करण्यात आली. या निवडीबद्दल जिल्हा कार्यकारणीच्या महिला प्रतिनिधी ज्योती सरपाते यांनी साक्षी कलेक्शन येथे येथोचित सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी सुरेश सिंग चौधरी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. भोकर येथील बहुजन नेते नागनाथरावजी घीसेवाड तालुक्यातील नेते भगवानरावजी दंडवे,भोकर नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष प्रतिनिधी शेख युसुफ भाई, युवा नेते संदीप गौड,युवा नेतृत्व संजय पाटील घंटलवार अहेमद भाई करखेलीकर, काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष निळकंठ वर्षेवार,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राजेश देशमुख, अनिल जाधव अरुण डोईफोडे लतीफ शेख, सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण कदम डौरकर, भीम टायगर सेनेचे जिल्हाध्यक्ष मिलिंद दादा गायकवाड, युवा पँथर सेनेचे निखिल भाऊ हंकारे,संतोष रतनवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सय्यद खालेद आदी सामाजिक राजकीय क्षेत्रातील मित्रपरिवारांनी शुभेच्छांचा वर्षाव केला व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या वतीने ज्योती मिराशे यांचा सन्मान

**हिमायतनगर**-आयोजित केलेल्या नांदेड जिल्हा पोलीस पाटील मेळावा व कार्यशाळेत हिमायतनगर तालुक्यातून उत्कृष्ट काम करणारे पोलिस पाटील ज्योती मिराशे यांची निवड करण्यात आली. या निमित्ताने त्यांचा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांना सन्मानित करण्यात आले. जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयाच्या वतीने पोलिस पाटील मेळावा नांदेड येथे पार पडला. सर्व तालुक्यातील उत्कृष्ठ काम करणाऱ्या पोलिस पाटीलाची निवड करून त्यांना पोलिस अधिक्षक यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. हिमायतनगर तालुक्यातील जिरोणा येथे पोलिस पाटील गेल्या अनेक वर्षापासून त्यांनी अविरतपणे काम केल्याने ज्योती मिराशे यांचा गौरव करण्यात आला. त्यांनी गावातील तंटे गावातच मिटवणे व तालुक्यातील सर्व पोलीस पाटील व तालुक्याची पोलीस प्रशासन यांच्यामध्ये समन्वय ठेवणे यासह अनेक कार्य उत्कृष्ट केल्याने त्यांच्या कार्याची दखल घेऊन मेळाव्यात त्यांचा अधिक्षक यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांचे सर्व स्तरावर अभिनंदन केले जात आहे.




### अनिता दाचावार यांचे निधन

**उमरी**-येथील अनिता संतोष दाचावार बितनाळकर वय ४२ यांचे हृदयविकाराच्या झटक्याने रविवारी दिनांक १६ मार्च दुपारी सव्वा बारा वाजता निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर सोमवारी (दिनांक १७) सकाळी नऊ वाजता उमरी शहरातील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले असा परिवार आहे. उमरी शहरातील प्रसिद्ध व्यापारी संतोष दाचावार बितनाळकर यांच्या त्या पत्नी होत. महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा व आर्य वैश्य समाजाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



# अंगणवाडी भरती पारदर्शक होणार : आ. कोहळीकर

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.१६ मार्च**

हदगाव विधानसभा मतदारसंघात होऊ घातलेल्या अंगणवाडी व मदतनीस भरती प्रक्रिया ८५ जागे करिता ६९५ अर्ज आले असून ही प्रक्रिया पारदर्शक व गुणाणूक्रमे शालेय गुण जास्त आहेत अशाच उमेदवाराची निवड होणार आहे. त्यामुळे कोणालाही व कोणत्याही आमिषाला हदगाव- हिमायतनगर मधील अंगणवाडी ज्या उमेदवार आहेत त्यांनी व त्यांच्या नातेवाईकांनी बळी पडू नये व अशी काही घटना किंवा माहिती आढळून आल्यास अशी बनवाबनवी करून निवड प्रक्रियेमध्ये जर शिफारस करून प्रक्रियेत काही देवाण-घेवाण व्यवहार जर लक्षात आला तर ती प्रक्रिया रद्द करण्यात येईल व त्या प्रक्रियेत नंतर निवड करण्यात येईल असे हदगाव विधानसभा मतदारसंघातील आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी हदगाव येथे विश्रामगृह पत्रकार परिषदेत सांगितले.

ज्या वेळेस हदगाव विधानसभा मतदारसंघातील अंगणवाडी मदतनीस या प्रक्रिया झाल्या त्या वादग्रस्त राहिले आहेत ही निवड प्रक्रिया आपल्या शालेय गुनानुक्रमे नुसार असून त्या शालेय गुणात त्यांची



निवड होणार आहे. त्यामुळे कोणाची शिफारस या अंगणवाडी भरती प्रक्रियेस चालणार नाही किंवा अशी काही माहिती जरी आपल्यापर्यंत आली तरी ती भरती प्रक्रिया रद्द करण्यात येईल.

अंगणवाडी व मदतनीस यांच्या बारावी परीक्षेमध्ये जे गुण मिळवले आहेत व त्यात बी.ए, बीएड, एम ए व मागासवर्गीय ओबीसी, एससी, एसटी, विधवा यांना जे शासन गुण देण्यात आले आहेत ते गुण एकत्रित करून त्या गुणाची बेरीज ज्याची जास्त येईल अशाच उमेदवारांना त्या अंगणवाडी प्रक्रियेस पात्र करून त्यांनाच निवड करण्यात येईल ही निवड पारदर्शक असून या निवडीत कोणालाही हस्तक्षेप करण्याचा अधिकार राहणार नाही जर असे आढळून आले तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई करून ती निवड प्रक्रिया रद्द करण्यात येईल अशी माहिती आमदार बाबुराव कदम कोहळळीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेत हदगाव शहरात व ग्रामीण भागात जल जीवन या योजने विषयी बरेच प्रश्न विचारण्यात आली तसेच हदगाव प्राथमिक शिक्षण विभागात ढासळत चाललेली प्रतिमा यावरही विद्यमान आमदाराला बरेच प्रश्न पत्रकाराने विचारले मी प्राथमिक शिक्षणात लक्ष घालून ही शिक्षण यंत्रणा चांगली दणकट करेल हे तुम्हाला काही दिवसात लक्षात येईल व तुम्ही मला प्राथमिक शिक्षणाविषयी अजून दोन महिन्यानंतर बोला त्यात पूर्ण बदल झालेले तुम्हाला दिसतील असा विश्वासा आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेला शिवसेना जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, अनिल बाभळीकर , संदेश हडसणीकर, संभाजी लांडगे, आबा वानखेडे, राजू तावडे, शितल भांगे, बबन मालोंदे, स्वयि सहाय्यक बबन कदम तर बरेच शिवसैनिक उपस्थित होते.

# आदमपूर येथे आढळला दुर्मिळ पोवळा साप

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि.१६ मार्च**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील शेतकरी शंकरराव माधवराव हांद्रे यांच्या घरात रविवार दि.१६ मार्च रोजी सकाळी ११ वाजता पोवळा जातीचा अतिविषारी साप आढळून आला.यावेळी येथील पुणे

वन्य पशु,पक्षी संरक्षण सामाजिक संस्थेचे सर्पमित्र राजेश मुंडकर,सर्पमित्र माधव कोळनुरे,सर्पमित्र सतिश मोरे व वन्य जीव प्रेमी जाफर आदमपूरकर यांनी तेथे धाव घेत पाहणी केली असता त्यांना तेथे अतिशय दुर्मिळ असा विषारी पोवळा जातीचा साप आढळून आला,यावेळी सर्पमित्रांनी त्याला कौशल्याने पकडून जीवदान दिले,

तर या सापाबाबतची माहिती आदमपूर परिसरातील वनरक्षक सहदेव दोसलवार यांना देत सदर सापाला निसर्गाच्या सानिध्यात मुक्त करण्यात आले.

# सिनेसृष्टीतील ५० कलावंतासह प्रख्यात नृत्य दिग्दर्शक गणेश आचार्य व नृत्यांगणा माधुरी पवार यांचे १८ रोजी लाईव्ह परफॉमन्स

## किनवटचा सुशांत ठमके रुपेरी पडद्यावर झळकण्याचं निमित्त

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.१६ मार्च**

येथील भूमिपुत्र उभरता अभिनेता शुशांत ठमके यांचा 'पिंटू की पप्पी' हा बॉलीवूड चित्रपट २१ मार्च रोजी जगभर प्रदर्शित होत आहे. यातील अजय अतुल जोडीतील अजय यांनी गायिलेल्या एका गाण्याची ऑनलाईन लाँचिंग १८ मार्च रोजी मातोश्री कमलताई ठमके शैक्षणिक संकूल कोठारी (चि) येथे सिनेसृष्टीतील प्रसिद्ध ५० कलावंतासह प्रख्यात नृत्य दिग्दर्शक गणेश आचार्य व नृत्यांगणा माधुरी पवार यांचे लाईव्ह परफार्मन्सेसचा आनंद घेण्यासाठी सर्व सिने संगीतप्रेमिंनी बहुसंख्येनं उपस्थित राहावे , असे आवाहन शुशांतचे वडील अभियंता प्रशांत ठमके यांनी केले आहे.

येथील शासकीय विश्राम गृहात आयोजित पत्रकार परिषदेत अभि. ठमके बोलत होते. यावेळी सिने स्तंभलेखक उत्तम कानिंदे , महेंद्र नरवाडे यांची उपस्थिती होती. अभिनेता म्हणून पहिल्यांदाच शुशांत ठमके रुपेरी पडद्यावर झळकणार आहे. विधी आचार्य निर्मित, शिव हरे लिखित-दिग्दर्शित, प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक गणेश आचार्य यांच्या मार्गदर्शनात तयार झालेला बीग बजेट बॉलीवूड चित्रपट पिंटू की पप्पी हा २१ मार्चला पाच भाषेत जगभर एकाच वेळी प्रदर्शित होत आहे. यातील नऊ



गाणी संगीत नृत्याच्या अविष्काराने देशभर प्रचंड गाजत आहेत.

किनवटचा भूमीपुत्र रूपेरी पडद्यावर झळकतोय यानिमित्त बॉलीवूड मधील ५० सिनेस्टार सह महानायक अमिताभ बच्चन पासून ते आजच्या पुष्पा-२ पर्यंतच्या सर्व अभिनेत्यास नृत्य दिग्दर्शनाचे धडे देणारे प्रख्यात नृत्य दिग्दर्शक गणेश आचार्य व प्रसिद्ध नृत्यांगणा माधुरी पवार किनवटच्या भूमिवर मातोश्री कमलताई ठमके शैक्षणिक संकुल कोठारी (चि) येथे मंगळवारी १८ मार्च रोजी सायंकाळी साडेपाच वाजतापासून पुढे लाईव्ह परमान्सेंस सादर करणार आहेत.

किनवट तालुक्याच्या इतिहासातील पहिल्यांदाच भव्यदिव्य मंचावर सिनेकलावंतांच्या संगीत कला आणि नृत्याचा नजारा सादर होणार आहे. किनवटकरांचे मुख्य आकर्षण ठरणाऱ्या या कार्यक्रमात नवोदित चित्रपट अभिनेता शुशांत ठमके, अभिनेत्री जान्या जोशी , विधी यादव यांच्यासह सिनेसृष्टीतील ५० कलाकारांच्या कलेची मेजवाणी याअविस्मरणीय क्षणी मिळणार आहे. यावेळी अजय अतुल जोडीतील अजय गोगावले यांनी गायिलेल्या एका गाण्याची ऑनलाईन लाँचिंग येथून होणार आहे. किनवटच्या इतिहासातील ह्या ऐतिहासिक क्षणी आपल्या भूमिपुत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आपण परिवारासह उपस्थित राहून या सोनेरी क्षणाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन आयोजक अभि. प्रशांत ठमके यांनी केले. यावेळी स्थानिक पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्याकडून सावरगाव ग्रामपंचायत व शाळेची पाहणी

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.१६ मार्च**

तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्याकडून सावरगाव (न) येथील आय.एस.ओ धरतीवर पुर्ण झालेल्या ग्रामपंचायत व जि.प. प्राथमिक शाळेतील कामाची पाहणी केली.

महिला सशक्तिकरणावर विशेष भर देत त्यांच्या कामाचे महत्त्व पटवून दिले. शाळेतील स्वच्छता व संस्कार अध्यापनावर समाधान व्यक्त केले. यावेळी महसूल तलाठी संघटनेचे अध्यक्ष भुमेश्वर विभुते,



निखील सुंदरगिरवार, मुंडे, माधव काकडे, पत्रकार जगदीश पाटील कदम, माजी.शालेय समितीचे अध्यक्ष निवृत्ती चांदणे, राम पाटील कदम, ज्ञानेश्वर पाटील कदम, परसराम चांदणे, बालाजी शेटकर, मुख्याध्यापक बी.बी.खेडकर, बाबर आर.आर, टोकलवाड व्ही. एस., बडगिरे बी.एस.,बालाघाटे बी.पी., सौ.चिद्रेवार व्ही.यु., सौ.उपरे एम.व्ही., सौ.भुस्कुटे एस.एम., सौ.भुजबळ जे.एन., सौ.इंद्राळे जे.बी. आदी उपस्थित होते.

# देगलूर - चेंडेगाव-बिदर, देगलूर ते हानेगाव राष्ट्रीय महामार्गाला जोडण्याची मागणी

## संतोष पाटील यांनी नितीन गडकरींना दिले निवेदन

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि.१६ मार्च**

नांदेड जिल्ह्यातील देगलूरमध्ये आजही चांगल्या रस्त्यांअभावी हा परिसर विकासापासून कोसो दूर आहे. देगलूर तालुका प्राचीन मंदिरासाठी प्रसिध्द आहे.

देगलूर तालुक्यातील होट्टल,रामपूर, येरगी आणि करडखेड येथे चालुक्य काळातील ऐतिहासिक वारसा असलेली मंदिरे आहेत, ती पर्यटन क्षेत्रे आहेत. त्यामुळे देश-विदेशातून लोक येथे येत असतात. मात्र येथे जाण्यासाठी चांगले रस्ते नसल्याने पर्यटकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

देशातील सर्व पर्यटन स्थळे राष्ट्रीय महामार्गशी जोडले जात आहेत.त्या धर्तीवर राष्ट्रीय महामार्ग क्र.६३ हा रामपूर - होट्टल - येरगी - चेंडेगाव (तेलंगणा)- माळेगाव - बिदर मार्गे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० शी जोडावा त्यामुळे नांदेड ते बीदर रस्ता सुद्धा कमी अंतराचा होतो.तसेच देगलूर ते हनेगाव रस्ता सुद्धा राष्ट्रीय महामार्गशी जोडावा ज्यामुळे शीख भाविकांना सुद्धा बीदर जाण्यासाठी सोयीचे व कमी अंतराचे होईल.

नांदेडहून येणारे शीख भाविक दररोज बिदर येथील गुरुनानक गुरुद्वारात जातात. परंतु हा रस्ता खूपच खराब झाल्याने शीख भाविकांना तसेच या मार्गावरून जाणाऱ्या शेकडो विद्यार्थी व नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. हा मार्ग चांगला झाल्यास विविध प्रांतातून येणाऱ्या सिख व इतर भाविकांना रामपूर,होट्टल,येरगी व करडखेड येथील चालुक्य कालीन मंदिरांना भेट देता येईल



आणि त्यामुळे या क्षेत्रातील पर्यटन वाढण्यास मदत होईल आणि आपली ऐतिहासिक सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी वाव मिळेल.हे चार ही मंदिरांचे पर्यटन सर्किट झाल्याने एक महत्वाचे पर्यटन सर्किट म्हणून प्रसिद्धीस येईल.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना दिलेल्या निवेदनात म्हटले की हा राष्ट्रीय मार्ग जोडून देगलूरच्या जनतेला खराब रस्त्यापासून दिलासा द्यावा. भाजपा जिल्हा उपाध्यक्ष तथा सरपंच संतोष पाटील यांनी सोमवारी दिनांक १० मार्च रोजी दिल्ली येथे सदरील निवेदन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना त्यांच्या निवासस्थानी भेटून दिले आणि याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची आग्रही भूमिका घेतली आणि सविस्तर चर्चा केली. यावेळी संतोष पाटील यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा येरगी येथील चालुक्य कालीन सांस्कृतिक वारसा दर्शवणारा कॉफी टेबल बुक देऊन सत्कार केला .

# उमरी नगरपरिषदेच्या वतिने महिला दिनानिमित संयुक्त कार्यक्रमाचा उपक्रम

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि.१६ मार्च**

उमरी शहरात संविधान अमृत महोत्सव अंतर्गत घर घर संविधान कार्यक्रम समारोप आणि माझी वसुंधरा अभियान ५ .० स्वच्छ सर्वे क्षण २०२४ - २५ तसेच बक्षिस वितरण व जागतिक महिला दिना निमित्त महिला मेळावा नगर परिषद उमरी यांचे वतीने आयोजित संयुक्त कार्यक्रम घेण्यात आला.



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्रीमती स्वाती दाभाडे उपविभागीय अधिकारीधर्माबाद तथा प्रशासक नगर परिषद उमरी उपस्थति होते, तसेच प्रमुख पाहुने म्हणुन जाईताई कैलासराव देशमुख गोरठेकर, दीपेश मढी भारतीय स्टेट बँक शाखा व्यवस्थापक, दिपाली मामीडवार माजी नगर सेवक, अनुसायाबाई कटकदवने माजी नगर सेवक, डॉ. भाकरे मॅडम, प्राचार्य अनुराधा कुलकर्णी , प्राचार्य स्वाती वच्छेवार, प्राचार्य शुभांगी माळवतकर कृषीधिकारी मिरासे, पदमावार दुय्यम निबंधक, कुलकर्णी गटशिक्षण अधिकारी, डॉ.अर्जुन शिंदे, ॲड. गुडाळे, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, माजी नगराध्यक्ष सुभाष पेरेवार, अनिल दर्डा माजी नगर सेवक, सोनु वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते, डॉ. जाधव, कैलास सोनकांबळे पत्रकार, फेरोज पेटल पत्रकार यांची उपस्थति होती. सदर कार्यक्रमात विशेष कार्य पुरस्कार म्हणुन संजीव विठ्ठलराव सवई शासकीय कंत्राटदार उमरी व मारवाडी युवामंच यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रस्ताविकात मुख्यधिकारी निलम कांबळे यांनी माझी वसुंधरा अभियान ५ .० अंतर्गत भूमी, वायु, जल, अग्नि व आकाश ह्या पंचतत्वांचे मोठया प्रमाणात जनजागृती करण्यात आली आहे महत्व पटवून दिले महिला दिनीच महिलाचा सन्मान न करता नेहमीच सन्मान आदर करावा असे उपदेश केला आहे .

यावेळी व सुरेख सूत्रसंचालन शिक्षक डी.एम कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन वरिष्ट लिपीक गणेश मदने यांनी मांडले यावेळी शहरातील महिला, नागरीक विद्यार्थी/विद्यार्थींनी मोठया संख्यंने उपस्थति होते. सदरील कार्यक्रम यशस्वी करणेसाठी उमरी नगरपरिषद अधिकारी/कर्मचारी घनकचरा कर्मचारी यांनी परिश्रम घेतले आहे.